दर्पण

March 2025

दर्पण संपादकीय विभाग

संपादिका: सुजाता साठे

sujatass@hotmail.com

उप-संपादिका: राजश्री पालकर

rajipalkar@aol.com

मांडणी/सजावट: अपर्णा मटंगे

अनुक्रमणिका

	शीर्षक	लेखक	पान क्रमांक
१.	संपादकीय	सुजाता साठे	१
२	MMOSF चे पान	अपर्णा मटंगे	२
३.	वेगळ्या वाटेवर	सुजाता साठे	४
४	साहित्याचे माणिकमोती	ललिता गंडभीर, मेलिसा साठे, वंदना गुडी	१०
५	सफरनामा	शोभा जोशी	२१
६.	खाना खजाना	सोनाली सुर्वे	२५
७.	सिनिअर्स कॉर्नर	डॉ. नीलकंठ पालकर	२७
८	किड्स कॉर्नर	अमारा मालेकर, रेयांश अणे, संस्कृती भंगाळे, रुग्वेद पाटील, सारा देशमाने	२८
१०	म्हणी पूर्ण करा (उत्तर)	रसिका जोशी	३४
११	गीतकार/कवी कोण?	रसिका जोशी	३६

अस्वीकरण - या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी व चित्रांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

संपादकीय

लेखिका - सुजाता साठे

बघता बघता दर्पणची सुरुवात करून एक वर्ष झाले. ह्या एका वर्षात दर्पणमध्ये वेगवेगळे साहित्य देण्याचा आम्ही प्रयत्न केला. आपापल्या क्षेत्रात काही वेगळे करत असलेल्या लोकांच्या मुलाखती, प्रवास वर्णने, विविध विषयांवरचे लेख, कविता, पाककृती, वेगवेगळी कोडी तसेच लहान मुलांचे लेख व चित्रे ह्यांचाही त्यात समावेश होता. दर्पणने अनेक लोकांना लिहायला प्रोत्साहन दिले व त्यांनाही आपल्याला लिहिता येते हे नव्याने कळले. तर येत्या वर्षातही तुमच्याकडून असाच प्रतिसाद मिळेल अशी आशा करते.

नवीन वर्षाचे स्वागत आपण खूप उत्साहाने केले. पण लगेचच म्हणजे ७ जानेवारीला लॉस अँजेलिसवर आगीचे मोठेच संकट ओढवले. तिथे कित्येक महिन्यात पाऊस न पडल्याने सगळी झाडे, टेकड्यांवरचे गवत सुकले होते. त्यात तिथे वाहणारे जोरदार सॅन्टा ऍनाचे वारे! ह्यामुळे आग खूप वेगाने पसरली. अमेरिकेतल्या वेगवेगळ्या प्रांतातून तसेच अनेक देशातूनही fire fighters मदतीला आले. अठरा हजार घरे जळाली, २९ लोक मृत्युमुखी पडले, हजारो लोकांना घरे सोडावी लागली. शिवाय तिथे राहणाऱ्या लाखो लोकांना दूषित हवा, पाणी ह्यांना तोंड द्यावे लागले. सगळ्या गोष्टी परत सुरळीत व्हायला कित्येक वर्षे जातील.

ह्या सगळ्याच्या मुळाशी बदलणारी हवा (ग्लोबल वॉर्मिंग) आहे हे नाकारता येणार नाही. फ्लोरिडामधेही येणाऱ्या हरिकेन्समुळे होणारे नुकसान आपल्या सगळ्यांना माहिती आहेच. दिवसेंदिवस ह्या वादळांचा जोर व संख्या वाढतेच आहे. ह्यासाठी आपण सर्वांनी आपला खारीचा वाटा उचलला पाहिजे. प्लास्टिकचा वापर कमी करणे, शक्य तेव्हा वस्तू recycle करणे, बागेसाठी ऑरगॅनिक खते वापरणे, फ्लोरिडामध्ये असणाऱ्या eco-system ला पूरक अशा झाडांची लागवड करणे तसेच आपल्या मुलांनाही ह्या सगळ्याची माहिती देऊन तशा सवयी लावणे हे खूप जरुरीचे आहे.

मला सांगायला आनंद होतो की ह्या अंकात असे प्रयत्न करणाऱ्या दोन व्यक्तींची तुम्हाला ओळख होईल. मायामीत अनेक वर्षे राहणारी वंदना गुडी हिने तिच्या शाळेच्या मागे असणाऱ्या Pineland चे खूप प्रयत्न करून पुनरुज्जीवन केले. तर मेलिसा साठे फ्लोरिडाच्या coral reef वरती बदलत्या हवामानामुळे काय परीणाम होतात व त्या कशा वाचवता येतील ह्यासाठी काम करते.

हा दर्पणचा अंक तुम्हाला कसा वाटला हे नक्की कळवा आणि तुमचे वेगवेगळे लेख व अनुभव शब्दांकित करून आम्हाला जरूर पाठवा. धन्यवाद!

sujatass@hotmail.com

MMOSF चे पान

लेखिका - अपर्णा मटंगे

नमस्कार मंडळी,

२०२५ सालच्या MMOSFची सुरवात खूपच धमाकेदार झाली. संक्रांतीचा कार्यक्रम खरं तर वर्षाचा पहिला कार्यक्रम असतो. पण यंदा, संगीत मानापमान या संगीत सिनेपटाने पहिला क्रमांक लावून MMOSFच्या कार्यक्रमाचे उदघाटन केले. निव्वळ दीड आठवड्यात ह्या सिनेमाच्या निर्मात्यांनी आम्हाला त्याचे दाखवण्याचे हक्क देऊन, आम्ही suggestion to implementation अशी मजल मारली. ८० तिकिटे निव्वळ ५ दिवसांच्या कालावधीत विकली गेली आणि संगीत मानापमान लोकांच्या नजरे समोर प्रदर्शित झाला. ह्या सिनेमाच्या वेळचे आणिक एक खास वैशिष्ट्य असे की सिनेमागृहातच गरम गरम चहा आणि सामोसा ठेवण्यास थियेटरच्या कार्यकारिणीने परवानगी दिली. त्यामुळे, सिनेमा पाहायाला आलेल्याना एक वेगळा पण सुखद धक्का बसला!!

लागलीच पुढल्या आठवडयातच संक्रांतीचा कार्यक्रम झाला. तब्बल १५० लोकांच्या हजेरीत हा सोहळा Charles Katz Community Center, Margate येथे अगदी थाटामाटात साजरा झाला. MMOSF च्या सभासदांचे स्वागत सर्वप्रथम कोकम सरबत देऊन झाले. त्या सोबत हळदी कुंकू, तिळगुळ आणि वाण देऊन लहान मुले व काही मोठी मंडळी देखील पतंग उडवायला सज्ज झाली. यंदाचे वाण, ठसठशीत कोल्हापुरी साज, सुवासिक गजरा, टिकलीचे पाकीट आणि एक छोटी sling/crossbody purse अशा ४ गोष्टींचे होते. MMOSFच्या photobooth समोर, आपल्या मंडळाचे सदस्य सचिन चव्हाण ह्यांच्या मॅजिक मेकर्सच्या सौजन्याने डिजिटल फोटोबूथ सज्ज झाला, आणि हे सर्वात मोठे आकर्षण आणि कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. दुपारच्या जेवणाचा खास मराठमोळा बेत होता. पुरी,भोगीची भाजी, मटारची उसळ, कढी, खिचडी, गाजराची कोशिंबीर, पापड, लोणचे, खास मुंबईहुन आलेली गुळाची पोळी आणि नंतर पान, अशी मेजवानी उपस्थित लोकांच्या पसंतीस आली. MMOSF चे सदस्य पूजा बाबा आणि चिन्मय पडसालगी यांनी सुरू केलेल्या 'The Kitchen Couple' ने पुऱ्या व भोगीच्या भाजीचे कॅटरिंग केले. जेवणानंतर, सर्व जमलेल्याना घेऊन मजेदार खेळ खेळण्यात आले आणि कार्यक्रमाचा गोड शेवट चहा ने झाला.

मार्च महिना म्हटला की सर्वांना चाहूल लागते, होळी आणि गुढी पाडव्याची. सालाबाद प्रमाणे यंदा देखील, March १५ ला Patch Reef Park मध्ये, होळी व पाडवा सहल आयोजित केली आहे. यंदाचे खास आकर्षण असणार आहे 'unlimited dosa station' आणि मुंबईहुन खास ऑर्डर केलेली पुरणाची पोळी, आणि सचिन चव्हाण च्या मॅजिक मेकर्सच्या सौजन्याने live DJ!! होळीच्या रंगात रंगायला आणि दरवर्षी प्रमाणे, यंदा देखील हा सण मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात साजरा करायला नक्की या!!

ह्या सर्व कार्यक्रमाच्या संगतीने MMOSF membership drive देखील चालू आहे. ह्या Membership मुळे सर्व वर्षांच्या कार्यक्रमाचा आराखडा रचायला, कार्यक्रमाची मांडणी करायला, त्यासाठी लागणाऱ्या जागा राखून ठेवायला, कार्यक्रमासाठी लागणाऱ्या काही गोष्टी मागवायला किंवा त्या इथेच तयार करायला खूप वेळ मिळतो व खूप मदतही

होते. सांगायला अतिशय आनंद होत आहे की २०२५च्या Membershipचा आकडा १३०च्या वर गेला आहे. आमच्यावरच्या विश्वासाची, प्रेमाची, आणि सहकार्याची तुम्ही दिलेली ही खरी पावती आहे. ज्यांनी membership घेतली आहे त्यांचे खूप खूप आभार, आणि ज्यांनी अजून नाही घेतली त्यांनी जराही विलंब न लावता membership घ्यावी ही विनंती.

२०२५ वर्षाच्या उत्तरार्धात होणाऱ्या प्रमुख कार्यक्रमांच्या तारखांची नोंद घ्यावी:

*Fitness and Charity Walk - *Saturday, April 12th (*details to be announced)

* महाराष्ट्र दिन - *Sunday, May 4th* – Shreyas Bedekar and Manasi Bedekar on behalf of Grace Entertainment from Houston will present the Marathi Vintage Studio. (details will be announced soon).

**गणपती सोहळा – Saturday, Sept 06,* at Glades Performing Arts Theatre, Boca Raton

**कोजागिरी – प्रशांत दामले यांचे नवीन नाटक 'शिकायला गेलो एक', Sunday, October 5th* at Glades Performing Arts Theatre, Boca Raton

**दिवाळी सोहळा – Saturday, November 1* at Larkins Community Center, Pompono Beach.

तर मंडळी, मंडळाने योजलेले कार्यक्रम हे कोणा एका व्यक्तीसाठी नसून, समस्त MMOSF परिवारासाठी असतात. तुमचा सहभाग, तुमचा प्रतिसाद आणि तुमची उपस्थिती हीच कार्यक्रमाच्या यशाची पावती असते, हे समीकरण आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे. आपणा सर्वांना नम्र विनंती आणि आग्रहाचे आमंत्रण कायमच राहील.

president@mmosf.org

वेगळ्या वाटेवर

लेखिका - सुजाता साठे

संधीचे सोने करणारी सोनाली

आत्तापर्यंत अशा गोष्टी मी फक्त ऐकल्या होत्या. ह्या गोष्टीत एका हुषार व्यक्तीला एक छान कल्पना सुचते. मग ती कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी ती एक Start-Up कंपनी सुरु करते. खूप कष्ट करून ती कंपनी यशस्वी होते. मग एक आणखी मोठी आणि नावाजलेली कंपनी खूप पैसे देऊन ही Start-Up विकत घेते. आणि ती हुषार व्यक्ती लाखोंपती होते. पण नुकतीच मला ह्या अशा व्यक्तीची मुलाखत घेण्याची संधी मिळाली. आणि ही कंपनी IT क्षेत्रातली नसून फूड इण्डस्ट्रीमधली आहे. एका आईच्या 'आपल्या मुलांना सकस आहार मिळावा' अशा तळमळीतून सुरु झालेली आहे. सोनाली सुर्वे हिने घरगुती स्वरूपात सुरु केलेली 'गजानन रोटी' आज कॅनडामधल्या एका मोठ्या कंपनीने विकत घेतली आहे. सोनालीची ही यशस्वी वाटचाल कशी झाली हे आज तिच्या बरोबरच्या गप्पांमधून जाणून घेऊ या.

मी:. "सोनाली, तुझे लहानपण कुठे आणि कसे गेले?"

सोनाली: "मी माहेरची सोनाली काळे. नाशिकमधल्या रविवार पेठेतील एका जुन्या वाड्यात आणि धार्मिक वातावरणात मी लहानाची मोठी झाले. वडील Maharashtra Engineering Research Institute मध्ये इंजिनियर म्हणून काम करायचे आणि आई महिला सहकारी बँकेत मॅनेजर होती. नाशिकच्या RJEMS ह्या शाळेत माझे १० वी पर्यंत शिक्षण झाले व नंतर KTHM ह्या कॉलेजमधून मी सॉफ्टवेअर इंजिनीयरची डिग्री मिळवली. मग नाशिकला एका सॉफ्टवेअर कंपनीत Oracle वर काम करत होते.

लहानपणीची एक घटना मला इथे सांगावीशी वाटते. मी कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला असतांना रात्री झोपेत मला गजानन महाराजांचा दृष्टांत झाला. मी सकाळी उठल्यावर आईला ही गोष्ट सांगितली. ती म्हणाली की आपल्याकडे गजानन महाराजांची पोथी आहे. ती वाचत जा. तेव्हापासून माझी महाराजांवर अतूट श्रद्धा आहे. नाशिकला त्यांच्या पादुका आहेत. तिथेही नियमित दर्शनाचा लाभ मिळत असे."

मी: "म्हणजे तुझी खूप लहानपणापासून महाराजांवर श्रद्धा आहे तर! मग पुढे राजेश कधी भेटला?"

सोनाली: "माझे लग्न आई वडिलांनी ठरवून झाले. राजेश व सासरचे सगळे तेव्हा गोरेगावात राहायचे. माझे सासरे एअर फोर्समध्ये होते व त्यांच्या बदल्या व्हायच्या. राजेशचे शिक्षण दिल्लीला व मुंबईला झाले. तो पण सॉफ्टवेअर इंजिनीयर आहे. आमचे लग्न झाले तेव्हा तो नोकरी करत होता. शिवाय एका मित्राबरोबर Soft Nova ही सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कंपनी सुरु केली होती. घरात फारसे धार्मिक वातावरण नव्हते. सगळीकडे हिंडल्याने मराठीसुद्धा फार चांगले बोलत नसत."

मी: "नाशिकच्या वातावरणातून आल्यावर तुझ्यासाठी हा मोठाच बदल होता. मग पुढे अमेरिकेत कसे आलात?"

सोनाली: "लग्नानंतर २००० मध्ये मला मुलगी (आकांक्षा) झाली. ती दोन वर्षांची असतांना राजेशला Crosscounty Healthcare ह्या त्याच्या कंपनीकडून अमेरिकेला येण्याची संधी मिळाली. आणि २००२ मध्ये H1 व्हिसा मिळून आम्ही तिघे फ्लोरिडात Boca Raton इथे आलो.

इथे आल्यावर माझा H4 व्हिसा असल्याने नोकरी करता येत नव्हती. तेव्हा वेळ होता म्हणून मी नामस्मरण व महाराजांची पोथी वाचत होते. मग २००४ मध्ये मुलगा (ओम) झाला. तेव्हा मास्टर्सची डिग्री घ्यायची इच्छा होती. पण मुले लहान असल्याने थोडे दिवस थांबायचे ठरवले."

मी: "ते बरोबरच ठरवलेस. सगळा वेळ मुलांचे करण्यातच जात असेल."

सोनाली: "हो, पण माझी पुढे शिकण्याची इच्छा जबरदस्त होती. मग मी Feng Shui Consultant झाले. YMCA मध्ये aerobics, dancing, strength training शिकले. लायब्ररीमधून वेगवेगळी पुस्तके आणून नवीन पदार्थ करायला शिकले. मला पहिल्यापासून हेल्थ आणि न्यूट्रीशन मध्ये रस होता आणि त्यांत काहीतरी शिकायची इच्छा होती. मुले थोडी मोठी झाल्यावर मी Central Arizona College मधून Nutrition and Dietetic Technician अशी डिग्री मिळवली. लॅबचे काम FAU-PBCC मध्ये आणि कोर्सेस online शिकले.

ह्याच सुमाराला काही गजानन महाराजांना मानणारे लोक मला भेटले. त्यांच्याबरोबर गजानन महाराज परिवार सुरु केला. महिन्यातून एकदा भेटून नामस्मरण, पोथी पारायण, वार्षिक प्रकट दिन सोहळा करायला सुरुवात केली."

मी: "मग nutrition मध्ये डिग्री मिळाल्यावर नोकरी सुरु केलीस का?"

सोनाली: "नाही. मला अजून व्हिसा मिळाला नव्हता. पण रिजेन्टस पार्क ह्या रिहॅबमध्ये इंटर्नशिप करतांना माझ्या लक्षात आले की तिथल्या पेशंटसना चांगले ताजे अन्न मिळत नव्हते. सगळे canned अन्न गरम करून द्यायचे. तेव्हा स्वतः काहीतरी सुरु करावे अशी कल्पना आली.

तेव्हा माझी मुले शाळेच्या स्विम टीममध्ये होती. मुले पुरेशा भाज्या व फळे खायचा कंटाळा करत. तेव्हा त्यांना जास्ती प्रोटिन्स, फायबर मिळावा म्हणून मी वेगवेगळ्या पोळया त्यांच्यासाठी करत असे. कणकेमध्ये squash, white beans आणि अव्हाकाडो घालून मी पोळ्या करत असे. मुलेही त्या आवडीने खात. शिवाय त्या दुसऱ्या दिवशीही मऊ रहात. आमच्या काही शेजाऱ्यांना व मित्रांनाही ह्या पोळ्या आवडल्या. त्यांनी आमच्या ऑर्डर्स घेशील का असे विचारले. तेव्हा या पोळ्याच आपले प्रॉडक्ट म्हणून विकावे अशी कल्पना सुचली. त्यातूनच GFoodZ चा जन्म झाला "

मी: "तुझ्या GFoodZ ची सुरवात अशी झाली तर! पण घरगुती पोळ्या करणे आणि मोठया प्रमाणात करून विकणे ह्यात खूप फरक आहे. तू मदतीला काही लोक ठेवलेस का?"

सोनाली: "नाही. लगेच मदतनीस ठेवले नाहीत. मी थोड्या पोळ्या इंडियन ग्रोसरी स्टोअर्स मध्ये ठेवून त्या लोकांना आवडतात का हे बघायचे ठरवले. खूप दुकानातून चौकशी केली. त्यातले काहीजण पोळ्या ठेवायला तयार झाले. हळू हळू लोकांना पोळ्या आवडू लागल्या व जास्ती पोळ्यांची ऑर्डर येऊ लागली. तेव्हा मी पहाटे चार वाजता उठून २००-३०० पोळ्या करायची. मग मध्ये मुलांच्या शाळेची तयारी, त्यांना शाळेत सोडल्यावर पोळ्या दुकानातून पोचवायच्या, मग परत त्यांना घरी घेऊन यायचे, नंतर त्यांना क्लासेस किंवा स्पोर्टससाठी न्यायचे असा दिनक्रम सुरु झाला."

मी: "एवढया पोळ्या एकटीने करणे सोपे नाही. खूप कष्टाचे काम आहे. शिवाय मुलांचे व घरातले काम! सगळे कसे सांभाळलेस?"

सोनाली: "मला महाराजांनीच बळ दिले अशी माझी श्रद्धा आहे. शिवाय राजेश पॅकिंग, डिलिव्हरीला मदत करायचा. मुलेही जमेल तशी मदत करत. जास्तीच्या ऑर्डर्स असतील तर मी दोन, तीन वाजता उठूनसुद्धा पोळ्या केल्या आहेत. पण घरात जागा कमी पडू लागली. तेव्हा आम्ही गराजमध्ये tortilla मशीन घेतले. त्याने काम थोडे सोपे झाले. पण मी सतत बिझिनेस कसा वाढवता येईल असा विचार करत असे."

Demonstration of healthy cooking !

सोनालीची इच्छाशक्ती आणि कितीही कष्ट घेण्याची तयारी हे गुण वाखाणण्यासारखे आहेत. त्याचबरोबर तिची महाराजांवरची श्रद्धा अढळ आहे. तिची पुढची झेप म्हणजे तिची इथल्या अमेरिकन मार्केटमध्ये पोळ्या विकायची इच्छा होती. त्यासाठी तिने डेल रे बीचच्या The Boys Farmers Market मध्ये प्रयत्न करायचे ठरवले. पण त्यानंतर तिला इतर फार्मर्स मार्केटस बद्दल समजले. या सगळ्या फार्मर्स मार्केटस मध्ये "West Palm Beach" चे मार्केट खूप नावाजलेले आहे. तिथे काही विकायचे असले तर त्यांच्या कठीण कसोटीतून जावे लागते. एके दिवशी त्या लोकांनी सोनालीला पोळ्यांच्या टेस्टिंगसाठी बोलावले. त्याची गंमतीदार आठवण तिने सांगितली.

सोनाली: "मी माझ्या पोळ्यांची छोटी सॅम्पल्स बरोबर घेतली. त्या कशा खायच्या हे दाखवण्यासाठी मी बटाट्याची परतून भाजी बरोबर घेत असे. थोडी भाजी पोळीवर घालून, त्याचा रोल करून मी खायला देत असे. तिथे गेल्यावर त्यांनी मला एक मोठे टेबल माझ्या गोष्टी ठेवण्यासाठी दिले. तिथे माझ्यासारखी आणखीही लोकं presentation करायला आली होती. त्यांनी त्यांची टेबल्स सुंदर सजवली होती. त्यांची तयारी बघून मला माझे दोन प्लास्टिकचे डबे व पेपर प्लेट्स ह्यांची लाज वाटली. आपल्याला मार्केटिंग कसे करायचे हे शिकले पाहिजे, ह्याची जाणीव झाली. माझी पाळी आल्यावर मला खूप भीती वाटू लागली. माझ्यापुढे तीन लोक बसले होते. त्यांना मी पोळ्या देण्याआधीच माझ्या मागे मोठा प्रकाश पडला. "हा फोटो कोणाचा आहे?" त्यातल्या एकाने मला विचारले. मी मागे वळून पाहिले तर गजानन महाराजांचा फोटो! माझ्या पोळ्यांचे 'गजानन रोटी' हे नाव वाचून त्यांनी गुगलवर शोध घेतला असावा. जणू काही "भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" याचा प्रत्ययच आला. महाराज माझ्या पाठीशी आहेतच असेच मला तेव्हा वाटले व भीती नाहीशी झाली. हे माझे Spiritual गुरु आहेत असे मी सांगितले. त्यांना माझ्या पोळ्या आवडल्या व त्यांनी मला ह्याला Wrap म्हणून विकता येईल, असे सुचवले. Wrap म्हटले की लोकांना कसे वापरायचे ते लगेच कळेल. मलाही ती कल्पना आवडली."

तिच्या अव्हाकडोच्या पोळ्या सगळ्यांना जास्ती आवडत. म्हणून त्याच विकायचे सोनालीने ठरवले. मग Avacado Wrap अशा नावाच्या प्लॅस्टिकच्या पिशव्या पॅकिंगसाठी करून घेतल्या. ह्यानंतर सोनालीची खरी घोडदौड सुरु झाली.

बिझिनेस एवढा वाढला की तिने Commercial Kitchen मध्ये जाऊन काम करायचे ठरवले. त्यासाठी बरीच लायसन्सेस घ्यावी लागली. पण मशिन्स मोठी असल्याने पोळ्यांच्या ऑर्डर्स पूर्ण करता आल्या. तयार पोळ्या व इतर सामान ठेवण्यासाठी फ्रीझर भाड्याने घेतले. आणखी दुकानातून ऑर्डर्स मिळवण्यासाठी presentation व डिलिव्हरीसाठी लोक कामाला ठेवले. Earthfare, Luckys Supermarket, Nutrition Smart, Brothers Market, वेगवेगळी फार्मर्स मार्केट्स ह्या दुकानांनी सोनालीचे Avacado Wrap ठेवायला सुरुवात केली.

खूप प्रयत्नांनंतर तिला Whole Foods ह्या लोकप्रिय सुपर मार्केटमध्ये उपलब्ध होण्याची संधी मिळाली. Whole Foods मार्केटमध्ये प्रवेश करणे अत्यंत कठीण, वेळ घेणारे आणि किचकट होते. Whole Foods च्या selection process नंतर मार्केटमध्ये प्रत्यक्ष दुकानात पोळ्या विकायला ठेवण्यात एक वर्ष गेले. पण फ्लोरिडातल्या सगळ्या Whole Foods मध्ये सोनालीचे wraps मिळू लागले.

सोनाली Wheat Chips (Baked), Zesty Mix, Quinoa Truffle, Spicy Potato असे वेगवेगळे स्नॅक्स सुद्धा बनवते. सोनालीच्या Avacado Wraps किंवा इतर स्नॅक्समध्ये कुठलेही केमिकल्स किंवा preservatives नाहीत. पूर्णपणे ऑरगॅनिक, ट्रान्स फॅट व डेअरी विरहित शिवाय कमी सोडियम असे सगळे प्रॉडक्टस आहेत. ते vegan डाएट करणाऱ्यांनाही चालतात. बृहन महाराष्ट्र मंडळ (BMM) ही उत्तर अमेरिकेतली संस्था दर दोन वर्षांनी विविध क्षेत्रांत विशेष कामगिरी करणाऱ्या लोकांना सन्मानित करते. सोनालीला २०१९ मध्ये BMM तर्फे Business and Entrepreneurship Award मिळालेले आहे.

इथे आणखी एक गोष्ट सांगावीशी वाटते. सुरवातीला सोनाली तीन डॉलर्सना एक १० पोळ्यांचे पाकीट विकायची. प्रत्येक पाकिटामागे एक पोळी असे ती जवळच्या सूप किचनला देत असे. म्हणजे १० पाकिटे विकली गेली की एक पाकीट डोनेशन देत असे. धंद्यात जम बसल्यावरही तिने हे चालू ठेवले. Whole Foods मध्ये ऑर्डर्स मिळाल्यावर ती आठवड्याला ३-४ पॅलेट्स एवढी पाकिटे विकत असे. एका पॅलेटमध्ये ७८ केसेस, एका केस मध्ये १२ पाकिटे व एका पाकिटात १० पोळ्या असा हिशेब असतो. तर एक पॅलेट ऑर्डर झाली की सोनाली ८ केसेस म्हणजे हजारच्यावर पोळ्या सूप किचनला किंवा फीडिंग अमेरिका अशा संस्थांना दान देत असे. हे खूपच कौतुकास्पद आहे.

एवढे काम असूनही सोनाली तिच्या इतर छंदांसाठी व सामाजिक कार्यांसाठी सुद्धा वेळ काढत असते. गेली ११ वर्षे सातत्याने "Guru Food Drive" या नावाने ती food donation drive organize करते आहे. ती Foster kids साठी clothing आणि toys drive देखील organize करते. ती community events आणि वेगवेगळ्या प्लॅटफॉर्म वर Food and Nutrition वर विनामूल्य seminars देते.

सोनालीला सुरवातीपासूनच गजानन महाराज परिवारासाठीही खूप काम करण्याची तळमळ आहे. त्यातूनच कांही कुटुंबांबरोबर मिळून सुरु केलेला छोटा परिवार आता खूप विस्तारला आहे. त्यांतुनच महाराजांचे देऊळही बांधले गेले आहे. या मंदिराच्या निमित्ताने सोनालीला ढोल ताशा पथक स्थापन करायची संधी मिळाली. आज "गुरु गर्जना ढोल ताशा" पथकात १५-२० लोक आहेत आणि त्यांना वेगवेगळ्या कार्यक्रमांना ढोल ताशा वाजवण्यासाठी आमंत्रणे येतात.

गेल्या वर्षी सोनालीचा "Avocado Wrap" product एका कॅनडामधल्या कंपनीने विकत घेतला आहे. त्यांना त्यांचे इतर प्रॉडक्ट्स Avocado Wrap बरोबर US Market मध्ये विकायचे आहेत. त्यामुळे सध्या ते Whole Foods मध्ये मिळत नाहीत. पण सोनालीच्या वेब साईटवर (GfoodZ.com) वर काही कालावधीसाठी अजूनही Avocado Wrap उपलब्ध आहेत. अजून हा सर्व व्यवहार पूर्ण झालेला नाही. ते कराराच्या प्रगतीत असल्याने जास्त माहिती देता येत नाही.

मी: "मग आता कंपनी विकल्यावर तुला बराच वेळ मिळत असेल. सध्या काय करतेस?"

सोनाली: "सध्या Government Wellness Co-ordinator म्हणून long term facilities , शाळा ह्यामध्ये न्यूट्रिशन व फिटनेसवर seminar देते. Bollywood Zumba क्लासेस घेते. शिवाय न्यूट्रिशन व फिटनेसवर एखाद्या व्यक्तीला सल्ला हवा असेल तर देते. माझ्या sonamotivates.com ह्या वेब साईटवर माझे न्यूट्रिशन व आरोग्य ह्या विषयांवरचे लेख आहेत. मी "Cook For Health" या अंतर्गत आरोग्याच्या गरजेप्रमाणे कोणतेही पदार्थ आणखी पौष्टिक कसे करता येतील असे कुकींग क्लासेस घेणार आहे. मी सध्या एका नवीन फूड प्रॉडक्टवरही काम करत आहे."

मला आणखी एक गोष्ट सांगायची आहे. ह्या सगळ्या यशात राजेशचाही मोलाचा सहभाग आहे. त्याने प्रत्येक टप्प्यावर मला मदत केली आहे आणि प्रोत्साहनही दिले आहे. सगळी लायसन्सेस मिळवणे, वेगवेगळ्या गोष्टींची माहिती मिळवणे, आर्थिक व्यवहार सांभाळणे इथपासून ते पॅकिंग, डिलिव्हरी ह्या सगळ्या गोष्टी त्याने केल्या आहेत. मला सांगायला आनंद होतो की माझ्या मुलांनाही योग्य आणि पौष्टिक खायलाच आवडते. आता मोठी होऊन कॉलेज, नोकरी करत असतांनाही खाण्याच्या बाबतीत खूप काळजी घेऊन दोघेही योग्य गोष्टी निवडतात."

“

मुलांनाही आपल्या आईच्या यशाचा खूप आनंद आणि अभिमान आहे. आकांक्षाने मला सांगितले की तिच्या आई-वडिलांना इतक्या वेगवेगळ्या गोष्टींची आवड आणि कुतूहल आहे की ते सतत नवीन नवीन गोष्टी करत असतात. तिलाही त्यांच्यासारखे थोडे जरी जमले तरी तिला आनंद होईल. राजेश व ती सध्या एक Documentary करत आहेत. सोनालीला तिच्या पुढच्या प्रकल्पांसाठी अनेक शुभेच्छा! तिच्या यशाची कमान अशीच चढती राहू दे!



सोनालीशी कनेक्ट होण्यासाठी ही लिंक वापरा :
linktr.ee/sonamotivates

Phone : (561)702-3238

sujatass@hotmail.com

साहित्याचे माणिकमोती

लेखिका - ललिता गंडभीर

कलाकृती

उद्या नरेंद्र अमेरिकेला जाणार याचे मोहिनीला फार वाईट वाटत होते. जाण्याच्या आदल्या दिवशीच तो घाईत असतानाही तिला पाच मिनिटांसाठी भेटला व म्हणाला, 'मोहिनी, हे सर्व इतकं अकस्मात ठरलं की मला आई-पप्पांना काही सांगायला वेळ झालाच नाही. पण मी तिकडे गेल्यावर नक्की पत्र लिहून त्यांना कळवितो. ते मुळीच विरोध करणार नाहीत. तू पण तुझ्या घरी सांग. आपण लग्न ठरवून ठेवू. जमल्यास तू अमेरिकेला ये. नाहीतर मी येतोच परत वर्षा दोन वर्षात.'

मोहिनी नुकतीच संगीत घेऊन बी.ए. झाली होती. नरेंद्र दोन वर्षांपूर्वी इंजिनियर होऊन नोकरी करत होता. त्याने अमेरिकेत मास्टर डिग्री घेण्यासाठी सहज अर्ज केला होता. नशिबाने त्याला ॲडमिशन व फेलोशिप पण मिळाली आहे. मोहिनी त्याला अधूनमधून बसस्टॉपवर भेटायची. हळूहळू त्यांची ओळख वाढत गेली. मोहिनीला लग्नाचं विचारावे का नाही या संभ्रमात त्याला गिरक्या खायलाही वेळ नव्हता म्हणून त्याने विचारून टाकलेच. मोहिनीला पण नरेंद्र आवडला होता. पण त्याच्या अमेरिकेला जाण्याने ती घाबरली होती. 'तो परत आलाच नाही तर?' 'तिकडे कुणाच्या प्रेमात पडला तर?' इत्यादी प्रश्न तिला सतत सतावत होते. तिने धारण केलेल्या मौनावरून नरेंद्र काय ते समजला व त्याने तिला विचारले,

"तुला मी पसंत आहे ना? मग झालं तर. बाकी तू काही काळजी करू नकोस. मी सर्व बघून घेईन." असे आश्वासन देऊन तो अमेरिकेला गेला. मोहिनीला फार वाट बघावी लागलीच नाही. साधारण एक महिन्याच्या आत नरेंद्रचे वडील तिच्या वडिलांना भेटायला आले. मुलगी दाखविण्याचा जुजबी कार्यक्रम होऊन नरेंद्रच्या आई-वडिलांनी मुलगी पसंत केली व लग्न ठरले.

मोहिनी वेळ घालविण्यासाठी आता काय करणार हा प्रश्न तिच्यापुढे उभा राहिला. 'आपण नोकरी करून पैसे मिळवावेत' असा तिचा विचार होता. पण तिच्या आईने विद्याताईंनी, तो खोडून काढला, "हे बघ तू फक्त पैशासाठी नोकरी करणार त्यात अर्थ नाही. आम्ही श्रीमंत नसलो तरी सुस्थितीत आहोत. तुझ्या लग्नाच्या खर्चासाठी पैसे ठेवलेलेच आहेत. तू लहानपणापासून गाण्यात हुशार, तू आतापर्यंत गाणं शिकलीस पण रियाज करायला अभ्यास, कॉलेज ह्यामुळे वेळ नव्हता. आता तुला वेळ आहे. तू गाण्याची प्रॅक्टिस कर. होईल तेवढं शिकून घे. लग्न झाल्यावर संसार मागे लागला की मग जमणं कठीण."

विद्याताईंनी आपला विचार मोहिनीच्या सासूला, रमाबाईंना बोलून दाखविला. रमाबाईंनीही त्याला एकदम पसंती दाखवली, "घरात कुणी गाणं शिकावं म्हणून माझी कित्ती हौस! दोघी मुलींना घातलं होतं क्लासला. पण त्यांनी सोडून दिला वर्षातच. मग नरेंद्राला घातला क्लासला तर तो दोन दिवससुद्धा नाही टिकला. माझी सून तरी आता निदान माझी हौस पुरी करेल. कशाला पाहिजे नोकरी! पैशाची जरुरी पडणार आहे का तुला?"

सासूबाईंचा दुजोरा मिळाल्यावर मग काय? मोहिनीने गाण्याला स्वतःला वाहून घेतले. मोहिनीच्या माहेरी व सासरी कुणी लहान नव्हतेच. मोहिनीची मोठी बहीण व भाऊ परगावी होती. नरेंद्रच्या दोन बहिणी लग्न होऊन सासरी

गेलेल्या होत्या. गावात एकटी मोहिनी होती. तेव्हा दोन्हीकडून तिचे व तिच्या गाण्याचे कौतुक सुरु झाले. नरेंद्रची पत्रे येत होती. वर्षा-दीड वर्षानेच परत यायचा त्याचा बेत होता. तेव्हा थाटाने लग्न करायचे असा सर्वांचाच बेत होता.

एकदा रमाबाईंच्या महिलामंडळात संमेलनाच्या दिवशी गाण्याचा कार्यक्रम ठेवायचा असे ठरले. तेव्हा रमाबाईंनी 'माझी सूनच गाणं म्हणेल' असे सुचविले. मोहिनीचे गाणे फारच छान झाले. तिथे एक रेडीओ प्रोग्रॅम चालविणाऱ्या बाई आल्या होत्या. त्यांनी मोहिनीचे गाणे आवडले म्हणून तिला रेडीओवर बोलावले. रमाबाईंना व विद्याताईंना तिचे कार्यक्रम यशस्वी होतात हे कळून अतिशय आनंद झाला आणि त्या दोघींनीही कार्यक्रम मिळविण्याचे प्रयत्न सुरु केले. हळूहळू ठिकठिकाणाहून मोहिनीला बोलावणी येऊ लागली. सासू सासरे किंवा आई-वडील यापैकी कुणी तरी तिच्याबरोबर जात. तिला यश मिळतेय हे बघून रमाबाई व विद्याताईंना प्रचंड उत्साह आला. त्या दोघीही जोमाने तिचे कार्यक्रम ठरविण्याचे काम सांभाळू लागल्या.

रमाबाईंचा उत्साह हा पप्पांच्या थट्टेचा विषय बनला, "आपली हौस सुनेमार्फत पुरी करतेय', 'दुसरा काही उद्योग नाही म्हणून हे काम लावून घेतलंय मागं' वगैरे बोलून ते रमाबाईंना चिडवत. 'पोरीला यश मिळतंय यात मी खूष आहे. अहो, आपलीच सून ती. घराण्याचं नाव काढेल,' अशा शब्दांत रमाबाई त्यांना उत्तर देत.

दोन वर्षांनी नरेंद्र लग्न करण्याच्या हेतूने परतला. पण दुर्दैवाने त्याचे सख्खे काका तेव्हाच वारले. त्यामुळे लग्नाचा बेत पुढे ढकलून पुन्हा तो अमेरिकेला परत गेला. नंतर त्याचे पत्र आले. तिथे त्याला भारतातील एक कारखानदार भेटला. तो फॉरेन कोलॅबरेशन घेऊन कारखाना काढणार होता. त्याने नरेंद्रची मदत मागितली. त्या हेतूने नरेंद्रने आणखी काही महिने अमेरिकेतच राहायचे ठरविले.

इकडे रमाबाईंनी आपल्या ओळखीच्या माणसांकरवी मोहिनीला एका सिनेमात प्लेबॅकचे काम मिळवून दिले. तिच्या गाण्याच्या रेकॉर्डस आणि टेप्स पण निघाल्या. मोहिनी बरीच प्रसिद्ध झाली. आता कार्यक्रम मिळविण्याची तिला जरुरीच राहिली नाही. आपणहूनच तिला कार्यक्रम व त्याबरोबरच पैसेही मिळू लागले. विद्याताई व रमाताई दोघींच्याही आनंदाला पारावार राहिला नाही, "सुनेने माझी हौस भागविली" असे म्हणत रमाबाई प्रत्येक कार्यक्रमाला जात असत.

नरेंद्र परत येईपर्यंत आणखी दोन वर्ष गेली. मध्यंतरी तो घाईने दोन दिवस फॅक्टरीच्या कामानिमित्त धावती भेट देऊन गेला. पण लग्न करायला त्याला वेळ नव्हताच. मोहिनी त्याला आपल्या कार्यक्रमाविषयी लिहित होती. तो पण, "उत्तम, उत्तम! असंच चालू राहू दे!" म्हणून तिला उत्तरे पाठवीत होता. शेवटी नरेंद्र कायमचा परत येईपर्यंत पाच वर्षे लोटली. मोहिनी आता स्वतःच्या नकळत कीर्तीच्या शिखरावर पोहोचली होती. नवोदित गायिका म्हणून ती सुप्रसिद्ध झाली होती.

नरेंद्रने परत येण्याची तारीख कळवताच विद्याताई व रमाबाईंनी मुहूर्त काढला. दोन महिन्यांनी लग्नाची तारीख ठरविली. मोठा हॉल बुक केला. आमंत्रणांच्या याद्यांचे काम सुरु झाले. नरेंद्र काही नुसता मास्टर्स करून परत येणार नव्हता. भारतातील प्रसिद्ध इंडस्ट्रियालिस्ट श्री. गजमुखे यांचा व त्यांच्या नव्या फॅक्टरीचा मॅनेजर म्हणून परत येत होता. सगळ्यांनाच, विशेषतः मोहिनीला व रमाबाईंना त्याच्या कर्तृत्वाचा फारच अभिमान वाटत होता. शिवाय लग्न म्हणजे आता साधेसुधे प्रकरण राहिले नव्हते. मोहिनीच्या व नरेंद्रच्या अनेक ओळखी झाल्या होत्या. त्यात

बडेबडे लोक होते. सर्वांची सरबराई करण्याची आवश्यकता होती. त्या कारणाने रमाबाईंची व विद्याताईंचीही धांदल उडाली होती.

नरेंद्र आल्यावर दुसऱ्या दिवशी नरेंद्रच्या फॅक्टरीचे उद्घाटन होणार होते. मुख्यमंत्री रिबीन कापून भाषण देणार होते. नरेंद्र व मोहिनी दोघेही उद्घाटन समारंभाला गेली होती. दोघांचे आईवडीलही गेले होते. भाषण झाल्यावर मुख्यमंत्री स्टेजवरच बसलेल्या नरेंद्र मोहिनीच्या दिशेने वळले. नरेंद्रला वाटले ते आपल्याशी बोलायला येत आहेत, म्हणून तो उभाही राहिला. पण ते बोलले मोहिनीशी, "तुम्हाला भेटून फार आनंद झाला. तुम्हाला टी. व्ही. वर पाहिलं आहे. या शुभप्रसंगी तुम्ही एक गाणं म्हणावं अशी माझी इच्छा आहे."

त्यांच्या विनंतीमुळे सर्वच प्रेक्षकांनी, आमंत्रितांनी टाळ्यांचा कडकडाट केला. मोहिनीने मग एक गाणे म्हटले. समारंभ संपल्यावर मोहिनीभोवती मोठ्ठे कडे पडले. तिच्याशी बोलायला, तिची सही घ्यायला लोक धडपडत होते. रिपोर्टर्स तिच्या लग्नाविषयी, भावी कार्यक्रमाविषयी तिला प्रश्न विचारत होते. आणि त्या सगळ्यात नरेंद्र एकटा बाजूला पडल्यासारखा झाला.

घरी परत जाताना नरेंद्राच्या कपाळावर सूक्ष्म आठी आहे हे मोहिनीला जाणवले. दुसऱ्या दिवशी तिने आपल्या सेक्रेटरीला फोन करून पुढच्या दोन महिन्यातले शक्य तेवढे कार्यक्रम पुढे ढकला किंवा रद्द करून टाका म्हणून सांगितले. पण त्यापुढे पुन्हा पुन्हा तेच होत राहिले. पार्टीला, सिनेमाला, नाटकाला कुठेही गेले तरी लोहचुंबकाकडे जसे लोखंड आकर्षित होते तसेच पुरुष, स्त्रिया व मुले मोहिनीकडे आकर्षित व्हायची. ती केंद्रबिंदू बनून नरेंद्र बाजूलाच राहायचा. नरेंद्राला आपण लहान वयातच मोठ्या फॅक्टरीचा पार्टनर झालो व तिचा मॅनेजरही झालो याचा फार अभिमान होता. घरात व मित्रमंडळीत त्याचे अपेक्षेप्रमाणे कौतुकही झाले. पण सर्वसाधारण जनतेत तो एक साधासुधा मनुष्य होता. त्याच्या यशाची फार किंमत कुणालाच नव्हती. नरेंद्राला हे फार खटकू लागले.

शेवटी त्याने रमाबाईंना बाजूला घेऊन सांगितलं, "हे बघ आई, मला पूर्वीचीच मोहिनी पसंत होती. ही आत्ताची नाही."

"म्हणजे? तिच्यात आणि हिच्यात काय फरक आहे?" आपला मुलगा काय म्हणतोय तेच रमाबाईंना कळेना.

"म्हणजे तिचं गाणं मला पसंत नाही. तिला माझ्याशी लग्न करायचं असेल तर सार्वजनिक गाण्याचे कार्यक्रम बंद करावे लागतील." नरेंद्र मुद्द्यावर आला.

"काय म्हणतोस? असं होतं तर आधी का नाही सांगितलंस? तुला लिहिलं होतं की तिचे कार्यक्रम होतात ते." रमाबाई चिडून म्हणाल्या.

"त्याचे हे दुष्परिणाम मला अमेरिकेत कळले नाहीत पण आता कळताहेत." नरेंद्रने आपल्या वागण्याचे समर्थन केले.

"मीच तिला किती मदत केली पुढे यायला." रमाबाई म्हणाल्या, "माझी सून म्हणून मला तिचा अभिमान वाटतो."

"ती तुझी सून आहे. बायको असती तर माझ्यासारखच वाटलं असतं तुला." नरेंद्र उत्तरला.

नरेंद्रचे पप्पा खूपच रागावले, "मोहिनीची कीर्ती आणि यश पेलवत नाहीये तुला! तू पण यशस्वीच आहेस, पण वेगळ्या क्षेत्रांत. तुझ्या यशाचे तिने कौतुकच नाही का केलेले? अरे, आधुनिक तरुण तू! बायकोच्या गुणांचं चीज व्हावं अशी तुझी इच्छा पाहिजे. विद्याताईंनी, तुझ्या आईने किती कष्टाने तिला वर आणली. ते कष्ट काय तुला हेव्यापोटी व्यर्थ घालवायचेत?"

पण पप्पांचे हे बोलणेही पालथ्या घड्यावर पाणीच जसे काही. नरेंद्र काहीच ऐकायला कबूल नव्हता. स्वतः पुढे होऊन मोहिनीला सांगायचीही त्याची तयारी नव्हती. शेवटी रमाबाईंनी मोहिनीला व तिच्या आई-वडिलांना बोलावणे पाठविले. त्यांच्या घरात पाऊल टाकताच मोहिनी चपापलीच. रमाबाईंच्या चेहऱ्यावरून काही तरी बिनसले आहे हे तिला कळले. आधीच नरेंद्र खुषीत नाही याची तिला काळजी लागलेली होतीच. सर्वजण खाली बसल्यावर पप्पांनी नरेंद्रची मागणी हळूहळू समजावून सांगितली. विद्याताई तर बधिरच झाल्या. पाच वर्षे झाली लग्न ठरून, पत्रिका पण छापायला गेल्यात आणि आता लग्न कसे मोडायचे? आणि मोहिनीला तरी गाणे सोड म्हणून कसे सांगायचे? मोहिनीचे वडील तर मनातून रागावले होतेच, 'काय हा कमकुवत मनाचा मुलगा? असली मागणी या क्षणी आईवडिलांकरवी करतो? स्वतः मोहिनीला विचारायची पण हिंमत नाही त्याला?' असे ओरडून म्हणावेसे वाटत होते त्यांना. मोहिनी स्वतः तर न हलता एका जागीच बसून होती.

शेवटी विद्याताईंवरच्या संस्कारांनीच जिंकले, "सोड बाई गाणं तू मोहिनी, नरेंद्राला नकोय तर!" असे त्या मोहिनीला म्हणाल्या. "घरातच म्हणत राहा हवी असल्यास."

"माझ्या गाण्याचं मला एवढं काही महत्त्व नव्हतंच-" मोहिनी म्हणली. 'मी खरी तर नोकरीच करणार होते. गाणं मी गाते पण माझी प्रसिद्धी, कीर्ती याचं सगळं श्रेय माझ्या आईला अन् सासूबाईंनाच! त्यांनी मला मूर्तीसारखं घडविलं आहे. मी त्यांचीच कलाकृती आहे' मोहिनी बोलायची थांबली. 'त्यांनाच जर मी गाणं बंद करावंसं वाटतंय तर नाही गाणार मी." असे ती पुढे म्हणालीच.

'त्यांना नाही. ह्या नरेंद्रमधल्या अहंकाराला,' नरेंद्रचे पप्पा मनात जळफळत होते. पुढे कोणीच काही म्हणाले नाही. मोहिनी, विद्याताई व मोहिनीचे वडील मुकाट्याने उठून घरी आले. आपल्या कलेची आज उत्तरक्रिया झाली असे मोहिनीला वाटले. विद्याताईंनी सुटकेचा निःश्वास सोडला आणि रमाबाईंना तर फारच वाईट वाटत राहिले.

दुसऱ्या दिवशी रमाबाई एकट्याच घरी होत्या. बेल वाजली आणि त्यांनी उठून दरवाजा उघडला. दारात म्लान चेहेऱ्याची मोहिनी उभी होती. ती रात्रभर झोपली नव्हती हे तिच्या चेहऱ्यावरून दिसतच होते. 'आई, मी खूप विचार केला' ती हळू-हळू खाली बसत म्हणाली, 'माझं नरेंदवर फार प्रेम आहे. त्याच्यासाठी गाणंसुद्धा सोडायला मी कबूल आहे. पण माझ्या मनात आता त्याच्याविषयीचा आदर उरलेला नाही. माझ्याबरोबर माझ्या यशाचा ज्याला स्वीकार करता येत नाही तो मनुष्य माझ्या प्रेमाला लायक नाही. तो असाच प्रसिद्धीच्या शिखरावर असता तर मी सोडलं असतं का त्याला? मग त्यानं मला का सोडावं? अशा हिणकस माणसाशी केवळ अनेक वर्षे लग्न ठरलंय आणि पत्रिका छापल्यात म्हणून लग्न करणं योग्य नाही. मनात जोडीदाराविषयी किल्मिष घेऊन लग्न करणं हा माझ्या स्वतःवर, त्याच्यावर व होणाऱ्या मुलांवर एक प्रकारचा अन्यायच आहे. म्हणून आई, मी हे लग्न मोडायचं ठरवलं आहे. मला माझ्या कलेसकट, प्रसिद्धीसकट स्वीकारणारा कुणी भेटलाच तर करीन मी लग्न, कधी तरी! माझ्या आईलाही मी समजावून सांगितलं. तुम्हीही समजून घ्याल अशी आशा आहे.' रमाबाईंना नमस्कार करीत मोहिनी म्हणाली, 'तुमची सून व्हायचं भाग्य नाही लाभलं, तरीपण जन्मभर मला मुलगी मानाल अशी खात्री आहे."

मोहिनी उठून हळूहळू घराबाहेर पडली. रमाबाई तिच्याकडे पाहत राहिल्या. एकदम त्यांच्या लक्षात आले की काल आपल्याला खूप वाईट वाटत होते ते आता नाहीसे झालेय. उलट आनंदच होतोय. जोरजोरात हसावेसे वाटतेय. त्यांच्या भावना त्यांनाच समजेनात. धावत धावत त्या खिडकीकडे गेल्या व पाठमोऱ्या मोहिनीकडे बघताना त्यांच्या लक्षात आले, 'मोहिनीची कला आणि कीर्ती जी आपण तनमन घालून जोपासली होती, ती मोहिनीची सून म्हणून होणाऱ्या नात्यापेक्षा महत्वाची झाली आहे. निदान आपल्या दृष्टीने तरी! आपण घडवलेली मोहिनीच्या कीर्ती आणि कलेची कलाकृती मोहिनीच्या नकारामुळे अभंग राहणार आहे. त्याचाच हा आनंद आहे." आणि रमाबाई एकदम मोकळेपणाने हसू लागल्या.

lalitagandbhir@hotmail.com

Melissa Sathe
लेखिका - मेलिसा साठे

Florida's Coral Reef

Did you know that Florida has a vast coral reef that stretches 350 miles from the Dry Tortugas off Key West all the way to the St. Lucie Inlet north of West Palm Beach. Florida's Coral Reef is the only coral reef system in the continental United States! Forty species of reef building corals make their home on Florida's Coral Reef. This reef provides important habitat, food, and breeding sites for millions of animals and plants. The northern 105 miles of Florida's Coral Reef faces the unique challenge of existing right offshore over 6 million people living in mainland South Florida. Corals here face many threats including disease, heat stress that can lead to bleaching, land-based sources of pollution, development, and damage from fishing and boating practices.

Coral bleaching is a response to stress where symbiotic algae living within coral tissue expel themselves and as a result the coral loses color. This can happen for a variety of reasons such as stress from pollution, sediment, changes in salinity, and temperature. High temperature stress from climate change is what most people think of when they hear coral bleaching. Corals can recover if the stressor is eliminated but if it continues, they can die.

Corals in Southeast Florida have also recently experienced an unprecedented disease outbreak. This is a waterborne, infectious disease suspected to be caused by bacteria. Over 95% of Florida's Coral Reef has been affected since it was first discovered in 2014. Over $15 million has been allocated by the State of Florida for response to this disease outbreak. Response has included coral rescue efforts where scientists collect coral tissue and bring back to a lab-based nursery to preserve their genetic material. These labs also practice large scale propagation in land-based facilities for future restoration efforts. Other response activities are tissue and environmental research and analysis and intervention where diseased corals are treated with antibacterial, and probiotics pastes which reduce the rate of tissue loss.

Land based sources of pollution are a big threat to Florida's Coral Reef. Everything that goes onto or into the ground in South Florida has the potential to find its way to our reefs. Too much fertilizer can cause increased growth of harmful algae which can smother corals. Pesticides can disrupt coral reproductive cycles. Some chemicals in commonly sold sunscreens can also harm coral reefs.

Irresponsible boating and fishing practices can harm our reefs. Boaters need to educate themselves on coral friendly boating practices such as anchoring in the sand and not on the reef. In fact it is illegal in the State

of Florida to anchor on reef. Boaters can tie up to permanently installed mooring buoys all along the reef to avoid anchoring.



Melissa at work

There is hope! The Florida Department of Environmental Protection (DEP) and its partners work every day to protect and conserve Florida's Coral Reef. Friends of Our Florida Reefs (FOFR) is a 501c3 nonprofit founded in April 2015 to assist, complement, and enhance the critical efforts of the DEP's Coral Reef Conservation (CRCP) and Coral Protection and Restoration (CPR) Programs to conserve and protect the northern 100+ miles of Florida's Coral Reef. Founded in April of 2015, FOFR is the legally dedicated citizen support organization for the DEP,CRCP and CPR. We exist to close the gap between the state government and citizen stakeholder effort to protect and conserve Florida's Coral Reef. You can help by visiting our website (https://www.floridareef.org/) and making a donation. You will be supporting annual reef cleanups and programs that train citizens to spot and report coral bleaching and disease, as well as volunteers who educate citizens about Florida's Coral Reef at various local events. To help conserve coral reefs in your day to day life you can limit the use of fertilizers and pesticides in your yard, eliminate single use plastic consumption, conserve energy, use mineral based sunscreen and most of all spread awareness!

About the Author: I joined the Board of Directors of FOFR in 2017 as Secretary and became president in April of 2020 and have served as President ever since. We are an all-volunteer run organization. My paying day job is working as a Senior Marine Scientist for a small environmental consulting business that works with coastal engineers. We help the engineers and their clients with the environmental permitting process as well as resource protections and monitoring assistance for coastal construction projects. I received my B.S. from Tulane University in New Orleans, LA in Ecology and Evolutionary Biology and Master of Science in Marine Biology from Nova Southeastern University where I was a graduate researcher for the Coral Reef Restoration, Assessment and Monitoring Lab. After completing my master's degree I worked at Miami-Dade County's Department of Environmental Resources Management where I managed coral reef monitoring field work and then I went onto the Florida Department of Environmental Protection's Coral Reef Conservation Program as the Reef Injury Prevention and Response Technician before moving onto consulting.

Sources: https://floridascoralreef.org/, https://floridadep.gov/rcp/coral, https://www.coralreef.noaa.gov/

melissa.sathe@gmail.com

साहित्याचे माणिकमोती

Vandana Gudi

लेखिका - वंदना गुडी

Once trashed now saved

Interview of Vandana Gudi Published in Miami Herald, April 2024 by Christina Mayo

Students preserve pineland next to their school.

Robert Morgan Educational Center students enjoy caring for the pine land preserve next to their school. But first it took years of organization. There have been numerous starts and stops to restoring a vital, important rocky pineland preserve nestled on the edge of Larry and Penny Thompson Memorial Park.

Vandana Gudi
Science Dept. Chair & Biology Teacher

But thanks to the dedication of Robert Morgan Educational Center teachers and students, as well as other organizations that care about the environment, this rare ecosystem, in South Miami-Dade, just south of Richmond Heights, is coming back to life.

"When RMEC was built in 2002, about five acres of the original land was given to the school to maintain as a nature reserve," said Science Department Chair, Vandana Gudi. "The school was responsible for its maintenance. Alas, everyone apparently forgot about that!"

Over the years, before Gudi joined the school, the site was used as a public dumping ground. And as more and more invasive, tall grasses grew into thickets, the preserve became dangerous for the students to even enter.

"We did not have the key to open the gate, so the original lock had to be cut and a new lock was put in. But we could not walk inside for more than a few steps as the growth of the grasses was very thick." Gudi said.

"To begin with we needed a permit to get the preserve cleaned up professionally. That took five years of back-and-forth but finally we received it in March 2019," Gudi said. "The next step was to find professional arborist who were familiar with the native plants but would get rid of the invasive species."

Gudi contacted parents of her students, other teachers, Fairchild Tropical Botanical Garden personnel, organizations such as The Institute of Regional Conservation, the county's solid west management department and others to clear the preserve professionally.

"The preserve was unkempt for almost 17 years and growth was so thick that it was not safe for any students or teachers to enter it. It needed to be treated by experts. That took another year and we settled with IRC," she said.

"The IRC started cleaning the preserve in August 2020," She said, "And as it was getting clear of the invasive tall grasses, a lot of garbage that had accumulated over the years was revealed. We found about 20 car and truck tires, building materials, glass bottles, cans, and such." Gudi said.

The preserve was only half cleared when the first cleanup by the students was organized in January 2021.

"By April 2021, the preserve was completely cleared of unwanted vegetation and its true beauty was unveiled. Now, it is slowly becoming a peaceful place once again. The students installed new birdbaths in the restored preserve."

"This preserve is a charming piece of the original ecosystem." Gudi said. "The IRC personnel pointed out the geological features such as solution holes, which were now revealed. We also found rare plant species, quite a few butterflies and variety of mushrooms and Mosses. They are still rare, but the native grasses have started showing up too."

"Since October 2021, every year as a part of Fairchild challenges million orchid project, we are growing orchids in the preserve. Since August 2021, we have held quite a few community service events for students. The first couple of times, we had to remove some fallen trees from the preserve, and the Environmentally Endangered Land (EEL) personnel graciously made several trips in their trucks to the dump where wood is responsibly disposed of."

She said, "The RMEC students enjoy visiting and cleaning up the native pinelands next to their school."

"Being in the nature preserve, I feel comfortable. In here, you tend to see a lot of the same faces. It is like a close community. Being there with each other feels like I am in a silent place and at peace, while I am absorbed in the work, I cut tall grasses, and it is rather soothing," said a student named Edwin.

Another student, Leyla Ni, said, “I really enjoy working in the preserve because it connects me to the nature and allows me to get fresh air as well as being able to help the environment. Mrs. Gudi makes it really fun and enjoyable as well by teaching us about different types of organisms.”

And student Giuliano said, “Cleaning up the nature preserve is always fun. It feels good to clean up my school, allowing it to look better and be safer for our students and staff. We can always have a great time while still learning about the biodiversity of the plants and organisms that we have in the nature preserve.”

Before and after



Gudi, who teaches Biology-1 and AP-Biology and is the sponsor of the Science National Honor Society, said it is important to care for this preserve for several reasons.

“First, this was the ecosystem throughout South Florida until the last 100 or so years. Humans started to live in South Florida and the destruction of the ecosystem began as the land development began. Today, there is only a fraction of the original ecosystem left in scattered patches throughout South Florida. The vegetation supports the fauna. Thus, to protect the local biodiversity, we all need to protect these fragmented rocky pinelands.

“Second, this is an excellent opportunity to introduce our students to the native habitats. I get comments like ‘I have never been in a place like this before!’ or ‘I feel like I am in Jurassic Park.’ And third this activity makes students aware of their natural surroundings. Students are going to protect only what they know about,” she said. “This is my humble attempt to make my students environmentally conscious.”

mrsgudi@gmail.com

सफरनामा

लेखिका - शोभा जोशी

हिरोशिमाची झालेली नवी ओळख

युद्धाचा इतिहास हा सर्वसाधारणपणे जिंकलेल्या पक्षांनी लिहिलेला असतो. त्यात काही सत्य तर काही अतिशयोक्ती असते. आणि काही घटना जाणीवपूर्वक वगळण्याचा किंवा विसरण्याचा प्रयत्न केलेला असतो. अशाच एका काळाच्या ओघात विसरलेल्या घटनेची ओळख मला जपानच्या प्रवासात झाली.

गेल्या वर्षी मी आणि माझी मैत्रीण सुजाता आम्ही जपानची ट्रिप केली. ही ट्रिप जपानी संस्कृतीची ओळख करून देणारी होती. या टूरमध्ये अनेक कार्यक्रम होते. आम्ही सुशी करायला शिकलो. आणि सुशी शेफचे प्रमाणपत्रदेखील मिळवलं. अत्यंत अवघड अशा जपानी लिपीची तोंड ओळख झाली. सामुरायच्या घरांना भेट दिली. सोन्याचा मुलामा देणाऱ्या कारखान्याला भेट देऊन लाकडी चॉपस्टिक्सना सोन्याचा मुलामा दिला. त्यांच्या गाण्याच्या प्रोग्रॅमला गेलो. गेशाया हाउसमध्ये जाऊन खऱ्याखुऱ्या गेशाबरोबर जेवण आणि गप्पागोष्टी झाल्या. शिंटो श्राइनस आणि बुद्धीस्ट टेम्पलस तर अनेक बघितली.

पण हिरोशिमा किंवा नागासाकी या शहरांची भेट आमच्या कार्यक्रमात नव्हती. नंतर आमच्या टूरमधले काही लोक हिरोशिमाला जाऊन आल्यावर मला तिथे जाण्याची तीव्र इच्छा झाली. मला स्वतःला इतिहास या विषयाची फार आवड. त्यातून हिरोशिमा आणि नागासाकीच्या घटना तर सगळं जग बदलून टाकणाऱ्या. हिरोशिमावर झालेल्या ॲटम बॉम्ब हल्ल्याविषयी आपल्याला बरीच माहिती इतिहासाच्या पुस्तकातून आणि चित्रपटाच्या माध्यमातून मिळालेली आहे. हल्ल्याच्या नंतरच्या इतिहासाला फारशी प्रसिद्धी मिळालेली नाही. आणि बऱ्याच गोष्टींवर मुद्दाम विस्मृतीचा पडदा टाकण्याचा प्रयत्न झालेला आहे. अशाच एका विस्मृतीत गेलेल्या गोष्टीचा नायक आहे जस्टिस राधाबिनोद पाल.

परत यायला दोन दिवस असतांना मी हिरोशिमाला गेले. आमच्या टूर गाईडने दिलेली माहिती घेऊन मी क्योटो हे बुलेट ट्रेनचे स्टेशन गाठले. वेटिंग रूममध्ये गाडीची वाट पाहत असताना एक वयस्कर जोडपे माझ्या शेजारी येऊन बसले. हॅलो, तुम्ही कुठून आलात? कुठे चाललात? वगैरे औपचारिक प्रश्नांची देवघेव झाली. हे दोघे ब्राझील देशाचे रहिवासी होते. मी अमेरिकेत असते, पण मूळची भारतीय हे ऐकून त्यांनी मला विचारले, की मी क्योटो किंवा टोकियो मध्ये जस्टिस राधाबिनोद पाल यांच्या स्मारकाला भेट दिली का? आता आश्चर्यचकीत व्हायची वेळ माझ्यावर आली. कारण स्मारकाला भेट देणे तर लांबच, पण मी हे नांवदेखील कधी ऐकलेले नव्हते. ते म्हणाले,

जमलं तर जरूर भेट दे आणि नेटफ्लिक्सवरची टोकियो ट्रायल ही मिनी सिरियल पण बघ. माझी गाडी आली आणि हा विषय तिथेच संपला. पण राधाबिनोद पाल हे नाव मात्र माझ्या मनात घर करून राहीले.



City hall before

हिरोशिमा स्थानकानंतर मी स्ट्रीट कार घेऊन पीस पार्कला गेले. इथे हिरोशिमाच्या सिटी हॉलची उद्ध्वस्त झालेली इमारत प्रथम दिसते. या इमारतीपासून सुमारे 600 मीटरवर ॲटम बॉम्बचा स्फोट झाला. सर्व कर्मचारी एका क्षणात बेचिराख! पुढची २-३ स्मारके बघून म्युझियम बघायला गेले. इथले देखावे बघून अनेकांना शोक अनावर झालेला! डोळ्यातून अश्रूधारा! वाटलं महाकवी व्यासांच्या कल्पनेतलं सर्व पृथ्वी जाळून टाकणारे ब्रह्मास्त्र ते हेच!

City hall after atom bomb hit

डॉक्टर ओपनहाईमर हा फिजिक्स विषयाचा प्राध्यापक. मॅनहॅटन प्रॉजेक्ट या ॲटम बॉम्ब बनवण्याच्या योजनेचा सूत्रधार. याला फादर ऑफ ॲटम बॉम्ब समजतात. या शास्त्रज्ञाचे अनेक पैलू होते. याला संस्कृत भाषा अवगत होती. त्याच्या मते जगातले सर्वात सुंदर महाकाव्य म्हणजे भगवत् गीता, जी त्याला तोंडपाठ होती. "परित्राणाय साधुनां विनाशायच दुष्कृतां" (अध्याय ४/८) हा श्लोक त्याला माहिती होता. तरी त्याच्या हातून हे निष्पाप लोकांची हत्या करणारे अस्त्र निर्माण झाले. की त्याने फक्त निष्काम कर्मयोग साधला? या विचारांनी मन सुन्न झालं.

दोन दिवसांनी आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. मी घरी आल्यावर जस्टिस राधाबिनोद पाल यांच्याविषयी माहिती गोळा करायला सुरुवात केली.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि त्यांच्या मित्रराष्ट्रांनी न्यूरेंबर्ग इथे नाझी वॉर क्रिमिनल्सवर खटला भरून त्यांना शिक्षा ठोठावल्या. त्याच धर्तीवर टोकियो इथे इंटरनॅशनल मिलिट्री ट्रिब्युनल फॉर फार ईस्टची स्थापना केली गेली. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, फ्रान्स, नेदरलँड्, चीन, रशिया, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, फिलिपिन्स आणि इंडिया या देशातल्या प्रत्येकी एक अशा जज्जेसची या कामासाठी निवड झाली. भारतातर्फे जस्टिस राधाबिनोद पाल या कलकत्त्याच्या हायकोर्ट जज्ज आणि लॉ कॉलेज प्रोफेसरची निवड झाली.

बऱ्याच सैनिकांवर त्यांनी युद्धात केलेल्या अत्याचारांकरता खटले भरून त्यांना इतर कोर्टांत शिक्षा दिल्या. ट्रिब्यूनलची जबाबदारी असलेले 28 आरोपी होते, ज्यात जपानचे पंतप्रधान, अर्थमंत्री, संरक्षण मंत्री, आणि इतर अनेक उच्च अधिकाऱ्यांचा समावेश होता. त्यांच्यावर

१) वॉर ऑफ अग्रेशन

२) वॉर क्राईम्स

३) क्राईम्स अगेन्स्ट ह्युमॅनिटी

असे आरोप केले होते. खटला दोन वर्ष चालला होता. अखेरच्या निर्णयाच्या वेळी अकरापैकी आठ जणांनी एक मताने सर्व आरोपींना गुन्हेगार शाबीत करून त्यांना शिक्षा ठोठावल्या. फ्रेंच आणि डच जज्जेसना आरोप मान्य होते, पण शिक्षेबद्दल दुमत होते. जास्त करून फाशीची शिक्षा त्यांना मान्य नव्हती. आता उरले होते राधाबिनोद पाल.



Radhabinod Pal

राधाबिनोद म्हणाले, “I AM WHOLLY DISSENTING”. त्यांच्या मते गुन्हे शाबीत झालेले नव्हते. म्हणून त्यांनी आरोपींना निर्दोष समजून सोडून देण्यात यावं, अशी मागणी केली. त्यांनी आपल्या मतांचे समर्थन स्वतः लिहिलेल्या १२३५ पानांच्या अहवालांत केलं. त्यांच्या मते या ट्रिब्युनलची स्थापना आणि सर्व खर्च अमेरिकेने केला होता. सर्व जज्जेस त्यांनीच निवडले होते. जपानचा एकही जज्ज या पॅनलवर नव्हता. एकूण ही एकतर्फी योजना असल्यामुळे आरोपींना न्याय मिळणं अशक्य होतं.

खटला चालू असतांना बऱ्याच साक्षी दिल्या गेल्या, ज्या अतिशयोक्तीने भरलेल्या होत्या. काही दाखले ऐकीव (Hearsay) आणि काही पुरावे जे आरोपींच्या बाजूचे होते ते रद्द केले होते.

१) वॉर ऑफ अग्रेशन याचा अर्थ एका देशाने दुसऱ्या देशावर कारण नसताना केलेला हल्ला, हे जपानच्या बाबतीत शाबित झालेलं नव्हतं. शिवाय हा गुन्हा युद्ध संपल्यानंतर अस्तित्वात आलेला होता. आणि अॅग्रेशन याचा अर्थ असा सोईप्रमाणे लावला जात होता.

२) जपानी सैनिकांनी शत्रुपक्षाच्या सैनिकांवर अमानुष अत्याचार केले होते. त्याबद्दल त्यांना कैद, जन्मठेप व फाशी अशा शिक्षा दिल्या होत्या. राधाबिनोद यांच्या मते ट्रिब्युनलची जबाबदारी असलेल्या आरोपींना सैनिकांच्या गुन्ह्याबद्दल जबाबदार धरणे चूक होते.

३) वॉर अगेन्स्ट ह्युमॅनिटी म्हणजे देशाच्या इतर नागरिकांवर केलेले अत्याचार. अत्याचार झाले होते हे राधाबिनोद यांना मान्य होतं. राधाबिनोद यांच्या मते हा गुन्हा युद्धानंतर नव्याने उपस्थित केला होता. तेव्हा तो पूर्व घटनांना लागू करणे इष्ट नव्हतं. तसंच करायचं असेल, तर इंग्लंड, फ्रेंच आणि डच लोकांनी त्यांच्या आशिया खंडातल्या कॉलनीजमध्ये नागरिकांवर जे अनेक अत्याचार आजवर केले आहेत, त्याबद्दल त्यांनाही गुन्हेगार समजलं पाहिजे. हे स्टँडर्ड वापरायचं असेल, तर राधाबिनोद यांच्या मते या गुन्ह्याचे सर्वात मोठे गुन्हेगार अॅटम बॉम्ब टाकणाऱ्या विमानांचे पायलट आणि त्यांना तसा आदेश देणारे अमेरिकेचे पुढारी समजले पाहिजेत.

राधाबिनोद म्हणाले, “THIS IS NOT JUSTICE, THIS IS VICTOR’S REVENGE”. राधाबिनोद यांचे हे प्रखर टीकास्त्र अमेरिका आणि मित्रराष्ट्रांना परवडणारं नव्हतं. अमेरिकेमध्ये अॅटम बॉम्बच्या उपयोगाबद्दल दुमत होतं. आणि युद्धामुळे इंग्लंड, फ्रान्स या देशांची अर्थव्यवस्था खूप बिघडली होती. भारत स्वतंत्र झाला होता. आणि आता इतर देशही स्वातंत्र्याची मागणी करत होते. राधाबिनोद यांचं मत बदलण्याचा प्रयत्न असफल झाला. ते

आपल्या मतावर ठाम उभे होते. भारतातल्या नवीन सरकारवरही दडपण आणलं. पण त्यांनी राधाबिनोद यांच्या मतांमध्ये ढवळाढवळ केली नाही.

शेवटी राधाबिनोद यांच्या मतांकडे दुर्लक्ष करण्याचा निर्णय अमेरिका आणि मित्र राष्ट्रांनी घेतला. ट्रिब्युनलच्या अखेरच्या निर्णयामध्ये राधाबिनोद यांचा अहवाल समितीमध्ये सामील केला नाही. एवढे करूनही अमेरिका आणि मित्र राष्ट्रांचे समाधान झाले नाही. त्यांनी या अहवालाचे जपानमध्ये जपानी भाषेत भाषांतर करण्यावर बंदी घातली. 1952 मध्ये सॅनफ्रान्सिस्को पीस ट्रीटीवर सही करून जपानने बिनशर्त शरणागती पत्करली. त्यानंतर अमेरिकेने जपानमधून काढता पाय घेतला.

दुसऱ्याच दिवशी जपानमध्ये राधाबिनोद यांचा अहवाल जपानी भाषेत प्रसिद्ध करण्यात आला आणि राधाबिनोद पाल हे नांव जपानमध्ये अजरामर झालं. “THIS IS NOT JUSTICE, THIS IS VICTOR’S REVENGE” हे वाक्य जपानी माणसाच्या काळजाला जाऊन भिडल. जगातल्या बलाढ्य शक्तींविरुद्ध उभे राहून हे 28 आरोपी निर्दोष आहेत असं सांगणाऱ्या राधाबिनोद यांच्याविषयी त्यांच्या मनातली नितांत आदराची भावना आजही जागृत आहे. भारत सरकारने त्यांना ‘पद्मविभूषण’ हा किताब देऊन त्यांचा सन्मान केला. पण आज भारतात फार थोड्या लोकांना त्यांची आठवण आहे.

“Pal Shimonak Hall” Memorial in Kyoto, Japan

जपानी लोकांच्या मनामध्ये त्यांचे स्थान कवी रवींद्रनाथ टागोर, सुभाषचंद्र बोस यांच्या बरोबरीचं किंवा त्यांच्याहूनही वरचं आहे. जपानच्या प्रत्येक पंतप्रधानांनी राधाबिनोद यांच्या कलकत्त्यातल्या घराला भेट दिलेली आहे. जपानमध्ये १९६६ साली त्यांना ‘ऑर्डर ऑफ सेक्रेड ट्रेझर फर्स्ट क्लास’ हा सर्वोच्च किताब देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. १९७४ साली त्यांच्या मृत्यूनंतर “Pal Shimonak Hall” हे स्मारक क्योटो शहरात उभारण्यात आले. १९९७ मध्ये स्थापन झालेल्या “Yasukuni War Shrine” मध्येही त्यांचे स्मारक आहे. त्यांचा नातू म्हणतो, जपानी लोकांना त्याची ओळख पटल्यावर वयाने कितीही मोठे असले, तरीही दोन पावलं मागे जाऊन कमरेत वाकून ते मला अभिवादन करतात. हे अभिवादन मला नसून राधाबिनोद यांच्या स्मृतीला असते.

sjoshi1125@aol.com

खाना खजाना

शेफ सोनाली सुर्वे

दुधीची वजन कमी करणारी साखर विरहित स्मूदी

साहित्य:

१ कप दुधी भोपळा (धुवून, सोलून आणि चौकोनी तुकडे करून)

१ कप कोहळा (धुवून, सोलून आणि चौकोनी तुकडे करून)

१ छोटी काकडी

१ टेबलस्पून लिंबाचा रस

१/२ इंच आले

१/२ इंच हळद (ताजे मूळ)

२-३ मिरीचे दाणे

चिमुटभर सैंधव मीठ

कृती:

सर्व साहित्य ब्लेंडरमध्ये घालून एकजीव करावे आणि smoothie चा आनंद घ्यावा.

sonalisurve@gmail.com

खाना खजाना

शेफ सोनाली सुर्वे

दुधी भोपळा भात

साहित्य:

१ कप तांदूळ (धुऊन १० मिनिटे भिजवलेले)

१ मध्यम आकाराची दुधी (धुतलेली, सोललेली आणि किसलेली) / साधारण १ कप

२ चमचे तूप + २ चमचे फोडणीसाठी

१ टीस्पून मोहरी

१ टीस्पून जिरे

१/४ टीस्पून हिंग

१/२ टीस्पून हळद पावडर

१/२ टीस्पून लाल तिखट

१/२ टीस्पून मीठ

१०-१५ कढीपत्त्याची पाने

१ किंवा २ चिरलेल्या हिरव्या मिरच्या

बारीक चिरलेली कोथिंबीर

कृती:

1. किसलेल्या दुधी भोपळयाचे पाणी हाताने पिळून घ्या आणि नंतर तांदूळ शिजवण्यासाठी ठेवा.
2. भांड्यात तूप गरम करा, तुपात दुधी भोपळा आणि तांदूळ परतून घ्या.
3. काढून ठेवलेले दुधीचे पाणी आणि १ ते १/२ कप पाणी धालून भात शिजवा
4. झाकण ठेवून मंद आचेवर १०-१५ मिनिटे शिजवा.
5. तांदूळ व्यवस्थित शिजले आहे का ते तपासा. नसल्यास आणखी ५ मिनिटे शिजू द्या.
6. फोडणीच्या कढईत तूप गरम करा.
7. मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता आणि चिरलेल्या हिरव्या मिरच्या घाला.
8. गॅस बंद करून त्यात लाल तिखट, हळद आणि मीठ घाला. चांगले मिसळा

९. शिजवलेल्या भात आणि दुधीच्या मिश्रणाला वरून फोडणी घाला. मिक्स करा

sonalisurve@gmail.com

सिनिअर्स कॉर्नर

Dr. Neelkanth Palkar
लेखक - डॉ. नीलकंठ पालकर

AMBITION

Ambition has been a dominant force in our lives. It is this force that dictates our actions, thoughts and perspectives.

It has allowed us to succeed in difficult circumstances, overcome hurdles and excel where others fail. Ambition acts as a catalyst that encourages us to achieve bigger and better goals. This is a trait that gets cultivated in childhood and we fondly nurture it. Ambition is regarded as an asset. Without ambition our actions would be aimless.

Remember, ambition can burn you out. In as much as it propels you all the while and you thrive on it, it is important to stop and 'smell the roses' along the way. Take a breath of fresh air and marvel at what life is and can be.

Sometimes, it is necessary to shed the ambition aside and just be a 'human'. Sometimes, it is helpful to think that it is okay to be alright than to be the very best. It is not wrong to sit down somewhere, have a cup of coffee in the hand, look out through the window and let the time pass. This has a tremendous soothing and calming effect. It rejuvenates your soul and energizes your body. Chores appear easy and less cumbersome. You will realize that there is more time and energy to do what you have on your mind!

Learn to relax a little and let God and destiny do the rest rather than you having to carry the entire burden of 'life' on your shoulders. That is a tiring task even for the most able.

True ambition is a deep desire to live usefully and to walk humbly under the grace of God.

nrvrpal@aol.com

किड्स कॉर्नर

चित्रकर्ती - अमारा मालेकर

Amara Malekar Age 6

priyasmalekar@gmail.com

किड्स कॉर्नर

लेखक – रेयांश अणे



ः भारत प्रजासत्ताक दिन ः

२६ जानेवारी रोजी भारत प्रजासत्ताक दिन साजरा करतो.
प्रजासत्ताक दिन हा भारताचा राष्ट्रीय सण आहे.
२६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्य घटना लागू झाली.
संविधान हा सर्वोच्च कायदा आहे.
बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आहेत.

रेयांश अणे
वय: ७ वर्ष

Reyaansh Aney (Age 7 years)

rashima.khadse04@gmail.com

किड्स कॉर्नर

लेखिका – संस्कृती भंगाळे



* प्रजासत्ताक दिन *

ज्या प्रमाणे परिवार चालविण्यासाठी, घर चालविण्यासाठी कुटुंब लागत, नियम लागतात, साधन सामुग्री लागते, पैसा लागतो, व्यवस्थापन लागत त्याचप्रमाणे एखादा देश चालविण्यासाठी सुद्धा त्या देशात राहणारी लोक, पैसा, कायदा सुव्यवस्था आणि त्याची अंमबजावणीही लागते.

आपला भारत देश हा १५ ऑगस्ट १९४७ला स्वतंत्र झाला. मात्र, आपल्या देशाच्या संविधानाचा कायदा हा (१९३१ Act) नुसार २६ जानेवारी १९५० या रोजी अंमलात आणला गेला ज्याला आपण सगळे प्रजासत्ताक दिन असे संबोधतो, आणि हाच दिवस का? तर या दिवसामागील विचार असा होता की याच दिवशी १९३० या साली "इंडियन नॅशनल काँग्रेस" ने "पूर्ण स्वराज्य" चा नारा दिला होता.

आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर लगेचच म्हणजे २९ ऑगस्ट १९४७ ला सात लोकांची कमिटी स्थापन झाली ज्यात संविधानाचा एक मसुदा/नमुना तयार करण्यात आला, या कमिटी चे प्रतिनिधित्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले आणि हा नमुना सर्व चर्चेतून स्वीकृत होऊन अखेर २६ जानेवारी १९५० या दिवशी अंमलात आणला गेला आणि त्यावेळेस डॉ. राजेंद्र प्रसाद हे भारताचे पहिले राष्ट्रपती बनले.



दर वर्षी या दिवशी राजधानी दिल्ली येथे परेड होते, नेत्यांचे भाषण होते, सांस्कृतिक कार्यक्रम होतात, सर्व राज्यातील एक एक समूह ज्या-त्या संस्कृती प्रमाणे व शैली नुसार वेष परिधान करून प्रांतीय लोक नृत्य सादर करतात.

या दिवशी इतर देशातील राष्ट्रपतींना मान देऊन पाहुणे म्हणून आमंत्रित करतात आणि याच दिवशी आपल्या देशातील विविध क्षेत्रात विलक्षणीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान म्हणून त्यांच्या कार्याप्रमाणे त्यांना 'पद्मश्री', पद्मभूषण, किंवा 'पद्मविभूषण' असा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात येतो.

दरवर्षीप्रमाणे सर्व शाळांमध्ये या दिवशी ध्वजारोहण होते, खेळ होतात, विद्यार्थी व शिक्षक वर्गाचे गायन होते, भाषण होतात, अल्पोहार वाटला जातो अशा विविध कार्यक्रमांनी हा दिवस मोठ्या जल्लोषात पार पडतो आणि याच दिवसापासून स्थापन झालेल्या संविधानाच्या कायद्यांमुळेच आपला देश चालतो आणि म्हणून आपण या प्रजासत्ताक या प्रजासत्ताक दिनाचा सन्मान करावा.

जय हिंद

जय भारत!

– संस्कृती भंगाळे

संस्कृती भंगाळे (वय वर्षे १३)

tanujabhangale@googlemail.com

किड्स कॉर्नर

लेखक - रुग्वेद पाटील

आदरणीय गुरुवर आणि माझ्या मित्र-मैत्रिणींनो, सुप्रभात आणि तुम्हा प्रत्येकाला प्रजासत्ताक दिनाच्या खूप खूप शुभेच्छा! 26 जानेवारी प्रजासत्ताक दिवस प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानाचा आणि उत्साहाचा दिवस आहे. आपला भारत देश १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. व भारताची लोकशाही राज्य घटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली. म्हणून हा दिवस 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा केला जातो.

स्वातंत्र्यानंतर सार्वभौम भारताची राज्यघटना तयार करण्याचे काम तब्बल २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस सुरू होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली संविधान २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी स्वीकृत करण्यात आले. आणि आपली लोकशाही राज्य घटना २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आली.

भारत या दिवशी लोकशाही, सार्वभौम, गणराज्य बनला. म्हणून हा दिवस प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस भारतात सर्वत्र साजरा केला जातो. या दिवशी लोक धर्म, जात, पंथ, सर्व काही विसरून एकत्र येतात. येतून आपल्या देशाची विविधता दिसून येते.

भारताची राजधानी नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी परेड होतात.

येथे भारतीय सैन्य आपली ताकद आणि आपल्या देशाची सांस्कृतिक विविधता दर्शवितात. प्रत्येक राज्यात, जिल्ह्यात, तालुक्यात, शहरांत आणि गावागावातून 'प्रजासत्ताक दिन' साजरा होतो. शाळांतून, सरकारी कार्यालयांतून व अन्यत्रही सकाळी ध्वजवंदन व अन्य मनोरंजनाचे कार्यक्रम होतात. ठिकठिकाणी प्रभात फेऱ्या, भाषणे, प्रदर्शन यांचे आयोजन केले जाते.

धाडशी मुलांचा, आणि विविध क्षेत्रात कर्तुत्व गाजवणाऱ्या व्यक्तींचा या दिवशी सरकार तर्फे गौरव केला जातो. अनेक ठिकाणी रोशनाई केली जाते. या दिवशी शाळकरी मुलांचा आनंदही वेगळाच असतो. या दिवशी संपूर्ण देशभर आनंदाचे व उत्साहाचे वातावरण दिसूण येते. पण केवळ उत्साहात दिवस साजरा केल्याने आपली जबाबदारी संपत नाही, खरे तर हा प्रतीज्ञेचा दिवस.

26 जानेवारी लोकशाहीचया उदघोषाचा दिवस. प्रत्येक भारतीयाने या महत्वाच्या दिवशी देशासाठी देशहितकारक कार्य करण्याची प्रतीज्ञा केलीच पाहिजे, आणि त्यानुसार वागले पाहिजे. असे राष्ट्रीय दिन साजरे केल्यामुळे प्रत्येकाच्या मनातील राष्ट्रीय भावना जागृत होते. प्रत्येकाला आपल्या देशाचा अभिमान असायलाच पाहिजे.

प्रजासत्ताक दिन

रुग्वेद पाटील (वय वर्षे १३)

shailpatil123@gamil.com

किड्स कॉर्नर

लेखक - रुग्वेद पाटील

भारत हा कृषीप्रधान देश आहे त्यामुळे या भारत देशात कृषी व्यवस्था व त्याच्याशी निगडित अनेक सण-समारंभ साजरे केले जातात. त्याचप्रमाणे मकरसंक्रांत जानेवारी महिन्यात व हिंदू पंचांगाप्रमाने पौष या दहाव्या मराठी महिन्यात येणारा शेती संबंधित असा हा महत्वाचा भारतीय सण आहे. या दिवसांमध्ये शेतांत आणि मळ्यांमध्ये असलेल्या धान्याचे वाण स्त्रिया एकमेकांना देतात.

हा दिवस सूर्याचा मकर राशीत संक्रमण दिवस मानला जातो. आता हिंदू दिनदर्शिकेमध्ये सूर्य उत्तरेकडे सरकतो. ग्रेगोरियन दिनदर्शिकेनुसार जानेवारी महिन्यात सूर्य मकर राशीत प्रवेश करतो तो दिवस दरवर्षी साजरा केला जातो. सूर्याच्या मकर राशीत प्रवेशाचा तो पहिला दिवस आहे. लिप वर्षामध्ये एक दिवस जोडल्यामुळे, मकर संक्रांतीची तारिख थोडी बदलू शकते. लीप वर्षात ते १५ जानेवारीला येते, अन्यथा १४ जानेवारीला असते.

मकरसंक्रांत हा एक सामाजिक सण आहे. हा सण रंगीबेरंगी सजावट, ग्रामीण मुलांनी घरोघरी जाने आणि बोलने "तिळ गुळ घ्या आणि गोड गोड बोला", गाणी गाणे अणि काही भागात भेटवस्तू मागणे, मेळे, नृत्य, पतंग उडवणे, शेकोटी पेटवने आणि मेजवानी यांसारख्या सामाजिक उत्सवांनी साजरी केली जाते. दर बारा वर्षांनी, हिंदू कुंभमेळ्यासह मकर संक्रांत पाळतात - जगातील सर्वात मोठ्या सामूहिक तीर्थक्षेत्रांपैकी एक, अंदाजे ६०-१०० दशलक्ष लोक या कार्यक्रमाला उपस्थित राहतात. या कार्यक्रमात, ते सूर्याला प्रार्थना करतात आणि गंगा आणि यमुना नदीच्या प्रयागराज संगमावर स्नान करतात. ही परंपरा आदि शंकराचार्यांना दिली जाते.

मकरसंक्रांत

ऋग्वेद पाटील (वय वर्षे १३)

shailpatil123@gamil.com

किड्स कॉर्नर

लेखिका - सारा देशमाने

॥ श्री गजानन महाराज ॥

मी कु. सारा महेश देशमाने, महाराष्ट्र मंडळ फ्लोरिडा मराठी शाळेमध्ये विद्यार्थी आहे. आम्ही मराठी शाळेचे विद्यार्थी अनेक कार्यक्रमामध्ये सहभाग घेतो, ज्यामध्ये आमचे शिक्षक व शिक्षीका आम्हाला मदत करतात. श्री आमि[redacted]न सर, सौ रसिका मॅडम, सौ अस्मिता मॅडम, सौ निला मॅडम, सौ संकल्पा मॅडम, ह्यांचा प्रेरणेमूळे आम्हाला मराठी शाळा हवी हवीशी वाटते. सद्गुरू श्री गजानन महाराज प्रकट दिन लेक वर्थ येथील [redacted] साई मंदिरामध्ये साजरा करण्यात आला, ज्यामध्ये आम्ही संक्षिप्त रामायण सादर केले. ज्यामध्ये सिता, राम, लक्ष्मण, रावण, कैकयी, मंथरा, दशरथ, उर्मिला साकारल्या गेले. मी [redacted]

गजानन महाराज

त्यामध्ये (साधू/रावणाचे) पात्र साकारले, हे करत असतांना मला बरोबर आणि चूक ह्यातील फरक कळाला. मला सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग घ्यायला आवडतो. [redacted] मी छत्रपती शिवाजी महाराज ह्यांची राजमुद्रा व त्याचा अर्थ सांगितला. आम्ही गर्जा महाराष्ट्र माझा हे गाणे सामुहिकरित्या म्हटले. टाळ्यांचा खूप कडकडाट झाला. आम्ही सर्व खूप खूष होतो. तथे गजानन महाराजांची पालखी निघाली ज्यामध्ये आम्ही लेझीम खेळलो, आणि पालखी मध्ये ढोल

गजानन महाराज

ताशांसोबत सद्गुरू गजानन महाराजांच्या नावाचा जलोष करत आम्ही मंदिरामध्ये प्रवेश केला. नंतर आरती झाली व सर्वांना प्रसादाच वाटप झाले. अशारीतीने कार्यक्रमाची सांगता झाली.

श्री. गजानन महाराज प्रकट दिन सोहळा

सारा देशमाने (वय वर्ष १२)

ashumanudesh@gmail.com

प्रश्नमंजुषा

लेखिका - रसिका जोशी

म्हणी पूर्ण करा (उत्तरे)

1. अंगाचा **तीळ** पापड होणे. - *खूप संतापणे*
2. अंगात नाही **बळ** आणि **चिमटा** घेउन पळ. - *दुर्बळ मनुष्य बलवान व्यक्तीवर सरळ हल्ला न करता छोटी खोडी काढून पसार होतो.*
3. अंथरूण **पाहून पाय** पसरावे.- *आपली आवक जेव्हढी असेल तेवढेच पैसे खर्च करावे*
4. **अक्कल** खाती जमा. - *नुकसान होणे*
5. अठरा **विश्वे** दारिद्र असणे. - *अति गरीबी असणे*
6. अडला हरी **गाढवाचे पाय** धरी.- *बलाढ्य व्यक्ती गरज असताना कोणत्याही व्यक्तीकडे मदतीची याचना करू शकतो*
7. अडली **गाय** अन **फटके** खाय.- *अडचणीत सापडलेल्या व्यक्तीस जास्त त्रास देणे*
8. अडाण्याचा गेला **गाडा**, वाटेवरची **शेते** काढा. - *मूर्ख माणूस कोणत्याही प्रकारे विचित्र वर्तन करू शकतो*
9. अतिपरीचयात **अवज्ञा**. - *अतिघनीष्ट सबंध हानिकारक ठरू शकतो*
10. अनुभवल्याशिवाय **कळत** नाही, **चावल्याशिवाय** गिळत नाही. - *एखाद्या गोष्टीत सहभाग घेतल्याशिवाय ती गोष्ट साध्य होत नाही*
11. अति **राग** भीक माग. - *क्रोधामुळे कोणतीही गोष्ट साध्य करता येत नाही*
12. असतील **शिते** तर **नाचतील** भुते. - *संपत्ती असलेल्या व्यक्तीकडे सर्वजण येतात*
13. अंगाची **लाही लाही** होणे. - *खूप संतापणे*
14. अंधारात केले तरी **उजेडात** आले. - *गुप्तपणे केलेली गोष्ट कधीही सर्वांना कळू शकते*
15. अगं अगं **म्हशी**, मला **कुठं** नेशी? - *एकाच्या चुकीसाठी इतर लोकाना दोष लावणे*
16. अठरा विश्व **दारिद्य** त्याला **छत्तीस कोटी** उपाय - *जीवनात यशस्वी होण्यासाठी अनेक उपाय आहेत, फक्त ते आचरणात आणले पाहिजेत*
17. अडाण्याची गोळी **भल्यास** गिळी - *अशिक्षीत माणूस कोणालाही अडचणीत आणू शकतो*
18. हातच्या **कंकणाला आरसा** कशाला - *उघड सत्य हे केव्हाही खरे करता येऊ शकते*
19. हा **सूर्य** आणि हा **जयद्रथ** - *पुराव्यासहित सिद्ध करणे*
20. हात दाखवून **अवलक्षण** - *उगाचच विविध गोष्टी मागे धावून हसे करुन घेणे*
21. **हत्ती** होऊन **लाकडे** ओढण्या पेक्षा, **मुंगी** होऊन साखर खाल्लेली बरी - *मोठेपणा न मिरवता छोटे होऊन आपले काम परिपूर्ण करणे*
22. सुंभ **जळतो** पण **पिळ** जळत नाही - *भरपूर शिक्षा होऊन सुध्दा वाईट प्रवृत्ती नष्ट करता येत नाही*
23. **साखरेचे** खाणार त्याला **देव** देणार - *सगळ्यांशी आपुलकीने वर्तन केल्यास असाध्य बाब साध्य होऊ शकते*
24. **श्वानाचीया** भुंकण्याला **हत्ती** देईना किंमत - *बलवान व्यक्ती दुर्बल माणसाला किंमत देत नाही*
25. शेरास **सव्वा**शेर - *प्रत्येक वाईट माणसाला त्यापेक्षा वरचढ माणूस मिळतोच*
26. वासरात **लंगडी गाय** शहाणी - *मूर्ख लोकांमध्ये कमी बुध्दिवान मनुष्यसुद्धा प्रसिद्ध असतो*
27. **वड्याचे** तेल **वाग्यां**वर - *एका गोष्टीचा राग दुसऱ्यावर काढणे*

28. **लहान**पण देगादेवा **मुंगी साखरे**चा रवा - *मोठेपणा न मिरवता छोटे होऊन आपले काम परिपूर्ण करणे*
29. **रात्र** थोडी **सोंगे** फार - *काम भरपूर, वेळ कमी*
30. **मूर्ती** लहान **पण कीर्ती** महान - *छोटा मनुष्य तरी कार्यक्षमता खूप असणे*
31. **मनी** वसे ते **स्वप्नी** दिसे - *आपण ज्या गोष्टीचा सदैव विचार करतो तीच गोष्ट आपल्याला आसपास दिसते किंवा आभास होतो*
32. भरंवशाच्या **म्हशी**ला **टोणगा** - *पूर्ण निराशा करणे*
33. बोलाचीच **कढी** बोलाचाच **भात** - *कार्य न करता वायफळ बडबड करणे*
34. **बैल** गेला अन **झोपा** केला - *एखादी गोष्टीचे महत्व संपल्या नंतर त्यासाठी उपाय योजना करणे व्यर्थ आहे*
35. बुडत्याला **काठीचा** आधार - *संकटग्रस्त मनुष्यास छोटी मदत सुद्धा मोठी वाटते*
36. बडा **घर पोकळ** वासा - *श्रीमंत असून कंजूष असणे, श्रीमंत असण्याचा आव आणणे*
37. पी **हळद** आणि हो **गोरी** - *उतावीळ होणे*
38. **नावड**तीचे **मीठ** अळणी - *नावडत्या व्यक्तीने केलेली कोणतीही गोष्ट आवडत नाही*
39. नव्याची **नवलाई** - *एखाद्या नवी गोष्टीचा उदोउदो करणे*
40. नकटीच्या **लग्नाला सतराशे** विघ्न - *मुळात कमी तयारीअसलेल्या कार्यात अनेक बाधा येणे*
41. दोन **डोळे** शेजारी, **भेट** नाही **संसारी** - *जिवलग दोन व्यक्तींची भेट जवळ असूनही न होणे.*
42. देणं न **घेणं** आणि **कंदिल** लावून येणं - *उगाचच एखाधाची कुरापत काढणे.*
43. दुसऱ्याच्या **डोळ्या**तील **कुसळ** दिसते पण स्वतःच्या डोळ्यातील **मुसळ** दिसत नाही - *स्वतःच्या चुकांकडे दुर्लक्ष करून दुसऱ्याच्या चुकांविषयी बोलणे*
44. दुःख **रेड्या**ला न डाग **पखाली**ला - *एखाद्याच्या त्रासामुळे दुसरी चांगली व्यक्ती त्रासात पडणे.*
45. दिल्या **भाकरी**चा सांगितल्या **चाकरी**चा - *एखादा मनुष्य एकाच ठिकाणी फार काहीअपेक्षा न ठेवता काम करतो.*
46. दांत **कोरुन पोट** भरणे - *उपजिवीकेसाठी फार थोडे श्रम घेऊन जीवन व्यतीत करणे.*
47. दक्षिणा तशी **प्रदक्षिणा**. - *व्यवसायात जसा लाभ असेल तसे महत्त्व आपल्या ग्राहकास देणे*
48. **दमडी**ची नाही मिळकत आणि **घडी**ची नाही फुरसत - *रिकामटेकडा मनुष्य आपण खूप व्यस्त आहे असे दर्शवितो.*
49. तुझी **दाढी जळू** दे पण माझी **वीडी पेटू** दे - *दुसऱ्याचे नुकसान झाले तरी चालेल पण स्वतःचा स्वार्थ साधणे*
50. तवा **तापला** तोवर **भाकरी** भाजून घ्यावी - *जोवर लाभ घेता येतो तोपर्यंत स्वार्थ साधून घेणे.*

rasika_j@hotmail.com

ओळखा पाहू

लेखिका - रसिका जोशी

गीतकार/कवी कोण

१. सांग सांग भोलानाथ, पाऊस पडेल का?

२. श्रावणमासी हर्षमानसी हिरवळ दाटे चोहीकडे; क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरूनी ऊन पडे.

३. कोटी कोटी रूपे तुझी, कोटी सूर्यचंद्र तारे. कुठे कुठे शोधू तुला, तुझे अनंत देव्हारे

४. अनाम वीरा जिथे जाहला तुझा जीवनांत

५. देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे... घेता घेता एक दिवस देणाऱ्याचे हात घ्यावे

६. हिरवे हिरवेगार गालिचे - हरित तृणाच्या मखमालीचे; त्या सुंदर मखमालीवरती - फुलराणी ही खेळत होती.

७. अनादि मी अनंत मी, अवध्य मी भला मारिल रिपु जगतिअसा कवण जन्माला

८. असेन मी, नसेन मी, तरी असेल गीत हे। फुलाफुलात येथल्या तरी हसेल गीत हे

९. स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला गतजन्मीची खूण सापडे, ओळखले का मला?

१०. चल उठ रे मुकुंदा, झाली पहाट झाली बाहेर चांदण्याला हलकेच जाग आली

११. राधे रंग तुझा गोरा सांग कशाने रापला? मिठीतुन सावळ्याच्या, रंग सावळा लागला

१२. सांगायची आहे माझ्या सानुल्या फुला, दमलेल्या बाबाची या कहाणी तुला

१३. कळीदार कपुरी पान, कोवळं छान, केशरी चुना रंगला काथ केवडा, वर्खाचा विडा घ्या हो मनरमणा

१४. छडी लागे छम छम। विद्या येईल घमघम छम छम छम

१५. कसेबसे सूर लावून गाणं गाता येईल?? जुन्या झाल्या नात्यालाही नवं करता येईल??

१६. नेहमीच नसतं अचूक कुणी, घड्याळ देखील चुकतं राव, जिंकलो जिंकलो म्हणताना निसटून जातो हातून डाव

१७. अजून नाही जागी राधा, अजून नाही जागें गोकुळ; अशा अवेळी पैलतिरावर आज घुमे का पावा मंजुळ

१८. सांग मला रे सांग मला आई आणखी बाबा यातून कोण आवडे अधिक तुला

१९. अजुनी रुसून आहे खुलतां कळीं खुले ना मिटले तसेच ओठ की पाकळी हले ना

२०. आला पह्यला पाऊस शिपडली भुई सारी धरत्रीचा परमय माझं मन गेलं भरी

२१. दिव्यत्वाची जेथ प्रतीती तेथें कर माझे जुळती

२२. कळा ज्या लागल्या जीवा, मला कीं ईश्वरा ठाव्या! कुणाला काय हो त्याचें? कुणाला काय सांगाव्या?

२३. गेलें द्यायचे राहून तुझें नक्षत्रांचे देणें

२४. गडबड घाई जगात चाले, आळस डुलक्या देतो, पण गंभीरपणे घड्याळ बोले आला क्षण गेला क्षण

२५. ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता

२६. जरी हात हाती तुझा, धुक्यासारखा स्पर्शहा पुन्हा एकदा सांग ना, आहेस ना?
२७. प्रेमस्वरूप आई! वात्सल्यसिंधू आई! बोलावूं तुज आता मी कोणत्या उपायी
२८. मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा! प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्रदेशा
२९. एकाच ह्या जन्मी जणू फिरुनी नवी जन्मेन मी
३०. मी कुठे म्हणालो परी मिळावी पण जरा बरी मिळावी
३१. स्वर आले दुरुनी, जुळल्या सगळ्या त्या आठवणी
३२. हे सुरांनो, चंद्र व्हा चांदण्याचे कोष माझ्या प्रियकराला पोचवा
३३. शुक्रतारा, मंद वारा, चांदणे पाण्यातुनी चंद्र आहे, स्वप्न वाहे धुंद या गाण्यातुनी
३४. ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला
३५. काटा रुते कुणाला आक्रंदतात कोणी मज फूल ही रुतावे हा दैवयोग आहे
३६. शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुनाची भीती देव, देस अन् धर्मापायी प्राण घेतलं हाती
३७. आज हृदय मम विशाल झाले त्यास पाहुनी गगन लाजले
३८. उषःकाल होता होता काळ रात्र झाली। अरे, पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली।
३९. जरा चुकीचे, जरा बरोबर बोलू काही चला दोस्त हो, आयुष्यावर बोलू काही
४०. अग्गोबाईSS ढग्गोबाईSS लागली कळ, ढगाला उन्हाची केव्हढी झळ
४१. चांदणे शिंपीत जाशी चालतां तूं चंचले ओंजळी उधळीत मोतीं हासरी ताराफुले
४२. केळीचे सुकले बाग
४३. अरे खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला
४४. तुझ्या गळा माझ्या गळा गुंफू मोत्यांच्या माळा
४५. ती येतें आणिक जातें, येताना कधि कळ्या आणिते, अन जाताना फुलें मागते
४६. कश्यासाठी पोटासाठी खंडाळ्याच्या घाटासाठी
४७. आदिमाया अंबाबाई, साऱ्या दुनियेची आई
४८. इंद्र जिमिजंभ पर बाडब सुअंभ पर रावन सदंभ पर रघुकुलराज है
४९. एक होकार दे फार काही नको; फार काही नको फक्त 'नाही' नको'
५०. तूं तेव्हा तशी, तू तेव्हा अशी, तूं बहारांच्या बाहूची

rasika_j@hotmail.com